# प्रकरण दूसरे

# प्रकरण दुसरे
# रवींद्र शोभणेंच्या कथासंग्रहातील आशयसूत्रे

## प्रस्तावना :-

समकालीन कथालेखनाचे स्वरूप आपण पहिल्या प्रकरणात पाहिले. समकालीन संज्ञेशी संवाद साधणाऱ्या कथासंग्रहांचा परिचय करून घेतला. समकालीन कथालेखन करणारे कथाकार आपण पाहिले.

समकालीन कथालेखनाचे स्वरूप पाहिल्यानंतर शोभणे यांची कथा समाकालीन संज्ञेशी संवाद साधणारी आहे असे दिसून येते व रवींद्र शोभणे मनोहर, भारत सासणे, बाबा पाटील, सखा कलाल, गौरी देशपांडे, सानिया, आशा बगे सारख्या कथाकारांप्रमाणे समकालीन कथालेखन करणारे कथाकार असलेले दिसून येतात. त्यांनी केलेले कथालेखन नागरी व ग्रमीण पध्दतीचे आहे. रवींद्र शोभणेंच्या कथासंग्रहाचा अभ्यास करण्यापूर्वी शोभणेंचा शोडक्यात परिचय करून घेवू.

## रवींद्र शोभणेंचा परिचय :-

रवींद्र शोभणे हे मूळचे नागपूर जिल्ह्यातील खरसोलीचे घरात शेतीवाडी, जोडीला शिंप्याचा धंदा होता. लहानपणापासूनच शोभणेंचा लिहिण्याचा छंद होता त्यामुळे त्यांनी पाचवीत असतानाच एक नाटक लिहीले व ते विनोदी स्वरूपाचे होते. पुढे मात्र त्यांना कविता लिहिण्याचा छंद जडला. कॉलेज जीवनात असाताना त्यांनी बऱ्याच कविता लिहिल्या परंतु एम. ए. करत असाताना त्यांना घरच्या परिस्थितीमुळे शिंप्याचा व्यवसाय करावा लागला व घरातील वातावरण गावंढळ स्वरूपाचे असल्यामुळे त्यांना लिखानासाठी प्रोत्साहन मिळाले नाही. परंतु त्यांनी गावातील बारीक निरीक्षण याच काळात केले व त्यांच्यातील अस्वस्थ असलेला लेखल जागृत झाला आणि कथेच्या रूपात, कादंबरीच्या रूपात अनुभव मांडले गेले. पुढे त्यांनी परिस्थितीमुळे नागपूरला वार्ताहर म्हमूनही नोकरी पत्करली पण त्याचा त्यांना उपयोगच झाला. कारम तिथे आलेले अनुभवसुध्दा त्यांनी आपल्या वर्तमान सारख्या कथासंग्रहातून मांडलेले आहेत. एम. ए. नंतर बी. एड्. ची पदवी घेवून ते नागपूरच्याच धनवटे नॅशनल कॉलेज, काँग्रेसनगर मध्ये प्राध्यापक झाले. नंतर त्यांनी पी. एच्.डी. पदवी संपादन केली व आज ते धनवटे नॅशनल कॉलेज, काँग्रेसनगर, नागपूर ला मराठी विभाग प्रमुख म्हणून काम करत आहेत.

१५ मे १९५९ ला जन्मलेले रवींद्र शोभणेंचे वय तसे ४२ ते ४३ च्या आसपास आहे पण एवढ्या कमी वयात त्यांनी बरेच यश संपादन केलेले आहे. बरेच पुरस्कार मिळवलेले आहेत.

## रवींद्र शोभणेंचे वाङ्मयीन कर्तृत्व :-

शोभणेंची आतापर्यंत कथा, कादंबरी हा वाङ्मय प्रकार चांगल्या प्रकारे हाताळला आहे. तसेच त्यांनी समीक्षा, दूरदर्शनसाठी नाटके लिहिली आहेत. शिवाय काही नभोनाट्ये प्रसारीत झालेली आहेत. त्याबद्दल सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे.

कथासंग्रह :
- वर्तमान / १९९१ (मॅजस्टिक प्रकाशन, मुंबई)
- कथांजली (संपादित) १९९१ (ऋचा प्रकाशन, नागपूर)
- दाहीदिशा / १९९४ (मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे)
- शहामृग / १९९८ (मॅजेसिटक प्रकाशन, मुंबई)

कादंबऱ्या :
- प्रवाह / १९९६ (महाराष्ट्र राज्या साहित्य आणि संस्कृती मंडळातर्फे प्रकाशित)
- रक्तध्रुव / १९८९ (मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे)
- कोंडी / १९९२ (मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे)
- चिरेबंद / १९९५ (देशमुख आणि कं., पुणे)
- सव्वीस दिवस /१९९६ (मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे)

समीक्षा :
- कादंबरीकार श्री. ना. पेंडसे / १९९६ (ऋचा प्रकाशन, नागपूर)
- सत्त्वशोधाच्या दिशा / २०० (अन्वय प्रकाशन, नागपूर)
- पुरस्कार/सन्मान मारोतराव तल्हार स्मृती पुरस्कार
- लोकमत पुरस्कार (ललित लेखनासाठी) रक्तध्रुव साठी
- म.सा.प.चा.ग.ल. ठोकळ पुरस्कार
- रोहमारे पुरस्कार
- नाथमाधव साहित्य पुरस्कार कोंडी साठी
- महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार
- ग्रंथोत्तेजक पुरस्कार, इचलकरंजी एज्युकेशन अँड
- चारिटेबल ट्रस्ट चिरंबद साठी
- रणजित देसाई कादंबरी पुरस्कार
- विदर्भ साहित्य संघाचा वा. कृ. चोरघरे पुरस्कार
- सा. वा. नाशिकचा डॉ. वा. वर्टी पुरस्कार शहामृग साठी
- म.सा.प. चा शंकर पाटील पुरस्कार
- साहित्य अकादमीची प्रवासवृत्ती

● कामगार कल्याण केंद्राचा उत्कृष्ट नाट्यलेखन पुरस्कार

दूरदर्शनवरून : ● इतिहास बदलतो आहे (१९८९)

प्रसारित नाटके ● त्रिशंकू (१९९२)

प्रसारित नभोनाट्ये : १. सूर्यविलाप, २. कथा कथेची, ३. खंदक, ४. झंबर, ५. त्रिशंकू.

अशा प्रकारे त्यांच्या साहित्यलेखनातून वाङ्मयीन अभिरूची सिध्द होते. तसेच त्यांच्याकडून आपणाला आणखी दर्जेदार कलाकृती वाचायला मिळू शकते अशी अपेक्षा निर्माण होते.

रवींद्र शोभणे यांच्या एकूण पाच कादंबऱ्या व तीन कथासंग्रह प्रसिध्द आहेत. त्यांना बरेच पुरस्कारही मिळाले आहेत. शोभणेंनी समीक्षा केली आणि समीक्षेच्याच अंगाने परिपूर्ण ठरेल असा श्री. ना. पेंडसे यांच्या कादंबऱ्यांचा चिकित्सक अभ्यास करून स्वत:ला डॉक्टरेट पदवी मिळवून देणारा प्रबंध लिहिला. त्यामुळे डॉ. रवींद्र शोभणे हे नाव साहित्याला अपरिचीत राहिलेले नाही.त्यांनी कादंबऱ्या व कथासंग्रह लिहून आपली गुणवत्ता सिध्द केली आहे. परंतु आता इथे मात्र आपण त्यांच्या कथासंग्रहाचाच फक्त विचार करणार आहोत. त्यांचे एकूण तीन कथासंग्रह प्रसिध्द आहेत त्यापैकी वर्तमान व शहामृग या दोनच कथासंग्रहाचा अभ्यास आपण करणार आहोत. त्यांनी आपल्या कथासंग्रहातून ग्रामीण आणि नागरी असे गोन्ही पध्दतीचे अनुभव कथांमधून मांडलेले आहेत.

## रवींद्र शोभणेंच्या कथालेखनाची वैशिष्ट्ये :-

### १. वर्तमान :-

वर्तमान (१९९१) हा शोभणेंचा पहिला कथासंग्रह प्रसिध्द झाला.हा कथासंग्रह एकूण आठ कथांचा संग्रहीत कथासंग्रह आहे. या आठही कथा पूर्वी विचारभारती, युगवाणी, लोकमत, गुलमोहर, तरूण भारत, नागपूर पत्रिका, मराठवाडा मधअये प्रकाशत झालेल्या होत्या. परंतु हा कथासंग्रह प्रकाशित होण्यापूर्वीचा काळ कथेसाठी निराशाजनक होता याबाबत वि. स. जोग म्हणतात की, १९८० ते १९९० हे दशक कथासंग्रहांच्या प्रकाशनाच्या बाबतीत काहीसे निराशजनक गेले. मराठी कविता, कादबंरी, आत्मचरित्रे किंवा स्वकथने आपापल्या बळाने या दशकावर प्रभुत्व गाजवीत राहिली पण नेमकी कथा संकोचली. हंस, सत्यकथा या वाङ्मयीन नियतकालिकांच्या बंद पडल्यामुळे मराठी कथाकारांची कोंडी झाली हे तर खरंच पण आपल्या दमदार आस्तित्वाने वाचकांचे लक्ष आकृष्ट करणारे कथाकारही या काळात कमी झाले.

शोभणेंचा वर्तमान हा कथासंग्रह प्रकाशित होण्यापूर्वी दोन कांदबऱ्या प्रकाशित झालेल्या होत्या व त्यांचा कादंबरी हा वाङ्मय प्रकार आवडीचा असूनही ते कथालेकनाकडे नंतर वळले व त्यांनी लिहिलेल्या आठही कथांना वाचकांनी चांगला प्रतिसाद दिला. त्यांच्या आठही कथा दर्जेदार आहेत हे कथासंग्रह प्रसिध्द

झाल्यानंतर सिध्द झाले आहे. म्हणूनच पुढे वि. स. जोग वर्तमान कथासंग्रहाविषयी ग्रांथिकी मध्ये म्हणतात की, अशा अंधारलेल्या कथादशकानंतर कथेच्या क्षितिजावर पुन्हा प्रकाशाचा उदय होतोय, याची जाणीव, नुसती जाणीव नव्हे तर याची खात्री याची ग्वाही देणारा प्रस्तुतचा वर्तमान हा कथासंग्रह आहे.

शोभणेंच्या आठही कथा ह्या नागरी जीवनावर आधारित आहेत व या कथा लेखकाच्या अनुभवातून साकार झालेल्या आहेत. म्हणूनच या कथांमधून वास्तवतेचे जरळून दर्शन घडते व या सर्व कथा वास्तववादी वाटतात हेच या कथांचे महत्वाचे वैशिष्ट्य म्हणता येईल. कथेतील अनुभवाबद्दल स्वत:शोभणे ६६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातील मासिकात म्हणतात की, माझ्या कथेतील कादंबरीतील माणसं मला कुठेतरी भेटून गेलेली आहेत. छेदूनही गेलेली आहे.[३]

शोभणेंच्या परिस्थितिमूळे वृत्तपत्राच्या ठिकाणी नोकरी करावी लागली. वृत्तपत्रीय व्यवसायातील आलेले अनुभव म्हणजे त्यांच्य आपुले मरण, हकनाक, सत्य सारख्या कथांचे चित्रण आहे. वृत्तपत्रातील सर्व काही असतेच असे नाही व जे सत्य असते, ते वृत्तपत्रात लिहिलेच जात नाही. वृत्तपत्राशी संबंधीत वार्ताहर, जनता, राजकारण या सर्वांचे चित्रण लेककाने प्रभावीपणे केलेले आहे. शोभणेंनी वाचकांना वृत्तपत्रीय जगातातील वास्तवता दाखवणअयाचा चांगला प्रयत्न केलेला आहे. हे या कथासंग्रहाचे वैशिष्ट्य आहे.

वर्तमान कथासंग्रहातील कर्वच कथा या सारख्या नाहीत त्यात विविधता असलेली दिसून येते. त्यांनी कथेतून वृत्तपत्रीय, राजकीय प्रश्न मांडले आहेत. त्यांच्या आठ कथांपैकी पायरीचा दगड, जल्लोश, तेथ लव्हाळे राहती ह्या कथा राजकारणप्रधान आहेत. तर स्त्रीपुरूषसंबंधावर आधारित एस शहर में हर शख्स .., न सापडलेले उत्तर, व आपले मरण ह्या कथा आहेत.

वर्तमान मधील सर्व कथा ह्या नागरी जीवनावरील आहेत. त्यामुळे शोभणेंनी कुठेही वैदर्भीय बोली भाषेचा वापर केलेला नाही उलट त्यांनी वापरलेली प्रमाम भाषा वाचून तर शोभणे हे विदर्भातील लेखक आहेत, यावर विश्वास बसत नाही. यावरून लिहिताना भाषेविषयी किती दक्ष असतात ते समजते तसेच ते पात्रांच्या स्वभाववैशिष्ट्यानुसार त्यांच्या तोंडी वाक्य देतात असे दिसते. उदा. हकनाक या कथेतील प्राध्यापक संस्कृतचे आहे. म्हणून त्यांच्या तोंडी ती मला शकुंतलेच्या सखी-सारखी वाटली. साक्षात प्रियंवदा ।[४] शोभमेंची भाषा सहज, सुलभ अशीच आहे. वाचताना कोणताही अडथळा येत नाही.

अशा प्रकारे वर्तमान कथासंग्रहाची वैशिष्ट्ये दिसून येतात. त्याचप्रमामे शहामृग कथासंग्रहाची वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे जिसून येतात.

**२. शहामृग :-**

या कथासंग्रहामध्ये एकूण पाच कथा आहेत व सर्व कथा ह्या दीर्घकथा आहेत. या पाच कथामधील काही कथा या नागरी जीवनाचे व मनाचे चित्रण करतात तर काही कथा या ग्रामीण जीवनाचे, मनाचे चित्रण

करतात. त्यामध्ये महाप्रस्थान व शहामृग या कथा नागरी जीवनावर आधारित आहेत तर ग्रामीण संवेदनशीलतेचा विचार करता केसाळ कातडीचे श्वापद, खेळिया सती आणि महात्मा या कथा ग्रामीण जीवनाचे, मनाचे चित्रण करतात.

शहामृग कथासंग्रहामध्ये लिलिलेली प्रस्तावना म्हणजे या कथासंग्रहाचा गाभाच आहे. यात शोभणेंनी स्वत:ची कथासंग्रहाबद्दल असलेली दृष्टी दाखवली आहे. पण आपण जेव्हा हा कथासंग्रह वाचतो तेव्हा तीच दृष्टी आपल्याला सुध्दा मिळते हे याचे महत्वाचे वैशिष्ट्यच म्हणता येईल. ते म्हणतात, इथल्या काही तथाकथित महापुरूषांनी स्वत:ला प्रेषित समजून आपापल्या चेहऱ्यावर कायमचा लिंपून घेतला एकेक मुखवटा, आपापल्या सोयीनुसार. खरा चेहरा वाटावा असा .. या मुखवट्यांना जसे तडे जाऊ लागले तसे दिसू लागले विकार. वासनांचे आणि क्षद्रत्वाचे खवले. सापाच्या देखण्या कातडीवर उठून दिसावेत, तसे थंडगार, तरीही जहरी मी स्वत:लाच प्रश्न करतो - मुळातले मुखवटे गळून पडताहेत? की माझ्या डोळ्यांवरचे झापड दूर होते आहे?.

शहामृगमधील पाचही कथांच्या आशयामध्ये व आशयसूत्रामध्ये विविधता दिसून येते. महाप्रस्थान व शहामृग याकथा स्त्री-पुरूषसंबंधातील आदीम नाते सांगून जाता. केसाळ कातडीचे श्वाद ही कथा मानसिक विकृतीचे चित्रण करते. तर खेळिया मध्ये पूर्ण राजकारणातील सत्ता संघर्षाचे चित्रण आलेले आहे व सती आणि महात्मा ह्या कथा समाज सुधारणेतील बेगडीपणा दाखवलेला आहे. अशा प्रकारे या कथांतून राजकीय व सामाजिक प्रश्न मांडलेले आहेत. पाचही दीर्घकथा आपापल्यापरीने वेगळेपण दाखवून जातात व वाचकांना विचार करम्यास भाग पाडतात. कारण सर्वच कथा सामान्य वर्गाची चाकोरी तोडणाऱ्या आहेत. त्यामुळे सामान्य वाचकवर्ग हा कथासंग्रह वाचताना चक्रावून जातो. मानवाचे बाह्या रूप खरे समजून आपण चालत असतो पण त्याचे आंतरिक रूप काही वेगळेच असते. त्या आंतरिक रूपाचेच प्राभावी चित्रण शोभणेंनी कथांमधून केलेले आहे. म्हणूनच शारदा हरीश काटोले साहित्यजत्रा मधून म्हणतात की, या दीर्घकथांचं आणखी एक वैशिष्ट म्हणजे मानवी संबंधांच्या आंतरविश्वाचं, अगोचर जामीवनेणिवात्मक घडणीच सूक्ष्मतर आणि विविध कंगाऱ्यांसह चित्रण करणे हे होय. मामसांचं एकीकरण, स्त्री पुरूषसंबंधातील गूढता, कामवासना व तद्नुषंगिक विकृती, सत्ता स्पर्धांचे विश्व इत्यादी मानवी संमिश्र जीवनातील अनेक बाबींचे चित्रण ही कथा मोठ्या कौशल्याने, मन:पूर्वकतेने आणि तेवढ्याच धिटाईने करताना दिसते.[६] हे विवेचन शोभणेंच्या कथालिखानाला समर्पक वाटते.

शहामृग हा दीर्घकथांचा संग्रह आहे. त्यामुळे कथांची संख्या आपोआपच कमी झालेली आहे. एकूण पाचच कथा असलेला हा कथासंग्रह कसदार बनलेला आहे. शोभणेंच्या अनुभव विश्वातून साकार झालेला हा कथासंग्रह माणसाचे खरे रूप दाखवतो. प्रत्येक कथेतील पात्रे ही समाजातील माणसांचे प्रतीक

वाटतात व शोभणे माणसांच्या मुळापर्यंत पोहोचण्यात यशस्वी झालेले दिसतात.

शहामृग मधील कथांमध्ये वेगवेगळे विषय आलेले दिसतात व सर्व कथांमधून अनेक प्रश्नही उपस्थित झालेले आहेत. शिवाय त्यात अशा काही व्यक्ती लेखकाने या संग्रहात रंगवलेल्या आहेत की ज्या व्यक्ती समाजात प्रतिष्ठित म्हणून वावरतात परंतु प्रत्यक्षात स्वत:च्या स्वार्थासाठी समाजाला धोका देत असतात. अशा चित्रणाविषयी बोलताना मुंबई तरूण भारत मध्ये प्रसन्न आगाशे लिहितात की, स्त्री-पुरूषसंबंधाकडे समाजाची पाहण्याची दृष्टी, समाजाने आखून दिलेल्यामर्यादांचे पालन करताना होणारी सामान्यांची दमणूक, स्वार्थ साधण्यासाठी वेळप्रसंगी आप्तस्वकीयांचा बळी देण्याची इच्छा मनी बाळगणारे महत्वाकांक्षी,समाजात उजळमाथ्याने वावरणारे आणि संधी मिळताच कोवळीक ओरबडमारे तथाकथित सुशिक्षित या साऱ्यांचे वेधक चित्रण शोधणे यांनी केले आहे.[७]

शंहामृग मधील कथा या नागरी व ग्रामीण जीवनावर आधारित आहेत. त्यामुळे शोभणेंनी नागरी जीवन चित्रित करताना प्रमाण भाषेचा वापर केलेला आहे. तर वैदर्भीय बोली भाषेचा वापर ग्रामीण जीवनातील संवाद चित्रित करताना केलेला आहे. पण शोभणेंची निवेदनाची भाषा ही प्रमाणच आहे.

सारांश, वर्तमान व शहामृग या दोन्ही कथासंग्रहांची वैशिष्ट्ये आपण पाहिली. तर त्यांचे कथालेखन उल्लेखनीय झालेले दिसून येते. दोन्ही कथासंग्रहामध्ये व्यक्तित्वाला अधिक महत्व दिलेले आहे. वर्तमान हा कथासंग्रह पूर्ण नागरी जीवनाचे चित्रण करतो. तर शहामृग मध्ये नागरी व ग्रामीण जीवनाचे चित्रण आलेले आहे. तसेच वातावरणानुसार नागरी कथा ग्रामीण दीवनाचे चित्रण येते व प्रसंगानुरूप भाषाशैलीचा वापर केलेला आहे.

वर्तमान कथासंग्रहामध्ये वृत्तपत्रातील जीवनावर अधिक कथा आलेल्या आहेत. तर काही कथा स्त्री-पुरूष संबंधावरील आहेत. तसेच राजकारणप्रधान कथाही आलेल्या आहेत. नागरी जीवनाचे चित्रण असल्यामुळे प्रमाण भाषेचा वापर केलेला आहे. स्वभाववैशिष्ट्यांनुसार वाक्ये व प्रसंगानुरूप भाषा आलेली दिसते.

शहामृग हा एकूण पाचच कथांचा दीर्गकथासंग्रह आहे. यातील कथांचे स्वरूप नागर व ग्रामीण आहे. कथांच्या आशयामध्ये व आशयसूत्रामध्ये विविधता दिसून येते. सर्व कथा सामान्य वर्गाची चाकोरी तोडणाऱ्या आहेत. भाषेचा वापर करताना कथेतील नागरी व ग्रामीण वातावरण बघून प्रमाणभाषा व बोलीभाषा वापरली आहे.

वरील प्रमाणे आपण वर्तमान व शहामृग या कथांसंग्रहातील वैशिष्टये पाहिली. आता आपण दोन्ही कथासंग्रहांच्या आशयामधून निघालेली आशयसूत्रे पाहणार आहोत.

## शोभणेंच्या कथेतील आशयसूत्रे :-

१. राजकीय जीवनातील भ्रष्ट व्यवहार.

२. स्त्री-पुरूषसंबंधातील ताणतणाव.

३. वतृपत्रीय जगतातील अनीतिमानता.

४. मानसिक दमनातून निर्माण झालेली विकृती

५. समाज सुधारणेतील बेगडीपणा

६. राजकारणातील सत्तासंघर्षाचे चित्रण.

### १. राजकीय जीवनातील भ्रष्ट व्यवहार :-

आजचे राजकीय जीवन म्हटले की, भ्रष्ट व्यवहार हा शब्द नवीन वाटत नाही. परंतु राजकीय जीवनातील सर्वच ठिकाणी भ्रष्ट व्यवहार चालत असेल असे नाही. तर त्याला व्यक्ती अपवाद सुध्दा असू शकतात हे आपण जर राजकीय जीवनाचा इतिहास पाहिला तर समजू शकतो पण आज राजकीय जीवनात भ्रष्ट व्यवहाराचे इतके जाळे पसरले गेले आहे की त्यात न अडकणाऱ्या व्यक्ती कमीच भेटतील. तरीही राजकीय जीवनाचे हेच एक सत्य आहे असेही नाही. कारण राजकीय जीवनाला अनेक पैलू असतात व शोभणेंनी राजकीय जीवनातील भ्रष्ट व्यवहाराचा एक पैलू उलगडून दाखवण्याचा प्रयत्न केलेला आहे.

रवींद्र शोभणे यांच्या दोन कथासंग्रहापैकी वर्तमान याकथासंग्रहातील पायरीला दगड, जल्लोश व तेथ लव्हाळे राहती या तीन कथांमधून राजकीय जीवनातील भ्रष्ट व्यवहाराचे चित्रण केले आहे.

शोभणेंनी पायरीचा दगड या कथेतून राजकारणातील अनीतिमानतेचे चित्रण केलेले आहे. या कथेमध्ये आमदार बाळासाहेब पाटील हे सुप्रसिध्द कार्यकर्ते असून राजकारणातील मुरलेली व्यक्ती आहे. बाळासाहेब शिंपी समाजाचा कार्यकर्ता म्हणून बेकार असलेला सुधीर सातपुतेला पुढे आणतो. त्याच्या वक्तृत्व कौशल्यामुळे त्याच्या समाजाचा त्याला पूर्ण पाठिंबा मिळतो. सुधीर नोकरी मिळावी म्हणून नोकर भरतीत समाजासाठी आरक्षण मागतो, आंदोलन करतो. बाळासाहेब सुधीरला आंदोलन मागे घेण्यासाठी व मते मिळवण्यासाठी समाजकल्याण खात्यात मुख्याधिकाराची नोकरी देवू करतो. सुधीर व बाळासाहेबांची भाची मृदुलाचे संबंध आल्यावर बाळासाहेब त्याला लग्न लावून घेण्यास भाग पाडतो. त्यामुळे आपोआपच हा सुधीर सातपुते राजकारणापासून पूर्णत: बाहेर फेकला जातो. कारण आता सुधीरला घर. नोकरी, बायको, गाडी सारख्या गोष्टी विनात्रास मिळालेल्या असतात. मात्र शेवटी शिंपी समाज आहे तसाच राहतो. बाळासाहेब मंत्री होतो पण तो नुसती आश्वासने देत राजकारण खेळत राहतो.

जल्लोश या कथेत कॉलेजमधील भ्रष्टाचारा विरूध्द लढा देताना सामान्य वर्गातील हुशार मुलाला आलेल्या अपयशाचे चित्रण केले आहे. साराभाई कॉलेजची निवडणूक म्हणजे प्रत्येक वेळी वादाचा विषय

ठरणारी, विद्यापीठात कॉलेज जेवढं मोठ तेवढं निवडणुकीचा गवगवा. मारामाऱ्या खून कोर्टकचेऱ्या हेवेदावे -मतभेद व ते मिटवण्याकरिता मुंबईतून मंत्र्यांचे हात लांबायचे. अशा या कॉलेजच्या निवडणुकीत प्रत्येक वर्षी यूथ व समता पॅनेल लढत असायची पण या वर्षी बी. कॉमला पहिला आलेला प्रभू मोवाडकर स्वतंत्र पॅनेल घेवून लढणार होता. परंतु प्रिन्सिपॉल व प्राध्यापक प्रभूला निवडणुकीतून माघार घ्यायला सांगतात कारण अध्यक्षांचा मुलगा समता पॅनेलचा उमेदवार असतो व त्याला कॉलेजचा पूर्ण पाठिंबा असतो त्यामुळे बाकीच्यांची हार निश्चित असते. प्रभूच्या हे सर्व लक्षात येत नाही तो विद्यार्थ्यंच्या पाठिंब्याच्या जोरावर निवडणूक लढवण्याचे ठरवतो व राजकारणातील डावपेचाखाली भरडला जातो. प्रभूचे आई-वडील सुध्दा त्याला समजावतात पण त्याच्या तरूण मनाला पटतनाही. अशी परिस्थिती येते की मतदानात घोटाळा झाला म्हणून प्रभू काही विद्यार्थ्यांना घेवून संप करतो व या संपाचा परिणाम म्हणून कॉलेज मधून त्याला काढले जाते.

निवडणुकीचा निकाल लागून समता पॅनेल येते. कॉलेज परत सुरू होते पण या सर्व जल्लोशात प्रभू आपले भविष्यच हरवून बसतो. परिणाम असा होतो की, तो प्रिन्सिपॉलना (प्राचार्यांना) कॉलेजच्या बाहेरून शिवीगाळ करू लागतो म्हणून त्याला पोलीस पकडून गेवून जातात व कॉलेजचे वातावरण जल्लोशातून निघून सुन्न व सुतक पडल्यासारखे होते.

तेथ लव्हाळे राहती कथेमधून एका गांधीवादी, सरळमार्गी माणसाने आजच्या राजकारणी माणसांशी एकट्याने लढा दिलेला चित्रित केला आहे. सुदामदादा हे स्वतंत्र्य सैनिक आहेत. गांधीवादी असल्याने त्यांच्यावर गांधीजींचा प्रभाव आहे. त्यामुळे ते गांधीजींच्या तत्वावर चालतात. पण आजच्या राजकारणात या तत्वांना काही किंमत उरलेली नाही हे त्यांना माहित आहे. म्हणूनच ते राजकारणात तिकीट मिळवू शकले नाहीत व त्याबद्दल त्यांना कधीही वाईट वाटत नाही. त्यांना दोन मुलगे आहेत. मोठा साहेबराव क्लार्क आहे. दुसरा बाबा त्याला अजून नोकरी नाही. मुलगी कमल शिकत आहे. सुदामदादा अता शिक्षकीपेशातून निवृत्त झालेत. पण गावात त्यांना मान आहे. गांधीजींच्या बोरबर त्यांनी स्वातंत्र्य पूर्वकाळात काम केलेले आहे. म्हणून त्यांना प्रत्येक टिकाणी बोलावले जाते.

सुदामदादांचा विद्यार्थी धैर्यधर पवार हा त्यांच्याच संगतीत राहून राजकारणात उतरला व दहा वर्षे आमदार राहिला तोही सुदामदांदाना मान देतो. पण जेव्हा धैर्यधरने एका शिक्षिकेला शीला जुनघेरला लग्नाचे वचन देवून शरीरसंबंध ठेवायला लावलेले असतात. लग्न मात्र करत नसतो. तेव्हा त्या मुलीशी लग्नाला सुदामदादा धैर्यधरवर जबरदस्ती करतात. तेव्हा शीलाचा खून करून आत्महत्या ठरवली जाते व खासदार बापूसाहेब आणि धैर्यधर सुदामदांदाना चूप बसायला सांगतात. सुदामदादाद या राजकारणी लोकांचे सर्व वाईट गोष्टी जगापुढे आणण्यासाठी स्वत:चे आत्मचरित्र लिहायचे ठरवतात आणि लिहायला सुध्दा लागतात.

तेव्हा धैर्यधर सुदामदादांच्या घरातील लोकांवर उपकार आपल्या बाजूने करतो. सुदामदादांच्या साहेबरावला बढती देतो. बाबाला नोकरी मिळवून देतो. कमलला मेडिकल किंवा इंजिनिअरिंगला प्रवेश देण्याचे कबूल करतो. त्यामुळे सुदामदादाने पूर्ण केलेले आत्मचरित्र साहेबराव जाळून टाकतो व सुदामदादांना स्वत:लाच जाळून टाकले असे वाटते.

अशा प्रकारे पायरीचा दगड, जल्लोश, तेथ लव्हाळे राहती या कथांच्या आशयावरून आपल्याला या कथा राजकीय जीवनातील भ्रष्ट व्यवहाराचे चित्रण करणाऱ्या आहेत हे समजते तसे या कथांमधून आलेल्या घटना प्रसंगावरून भ्रष्ट व्यवहाराचा उपयोग कशा प्रकारे केला आहे ते समजते.

पायरीचा दगड या कथेमध्ये बाळासाहेब निवडणुकीत शिंपी समाजाची मते मिळवण्यासाठी भ्रष्ट व्यवहाराचा उपयोग करतात ते पुढील प्रसंगातून दिसते -

१. शिंपी समाजाचा वधू-वर मेळावा भरवतात तिथे सुधीर सातपुतेची ओळख समाजसेवक म्हणून करून देतात.

२. सुधीर सातपुतेने केलेल्या आंदोलनातील लोकांना जमानत देवून व शिंपी समाजाच्या मनामध्ये आदर मिळवतात.

३. शिंपी समाजाची मते मिळरण्यासाठी व नोकर भरतीचे आंदोलन मागे घेण्यासाठी सुधीरला नोकरी देवू करतात.

४. सुधीरने नोकरी स्वीकारावी म्हणून सुधीरला, व्यावहारात प्रत्येक वेळी आपल्या तत्वांचा विजय होतोच असं नाही आणि तत्वांचा विजय झाला असता तर रामराज्य आलं असतं आज तत्वांपेक्षा व्यवहाराचा विजय होतो नेहमीच. व्यवहार शीक. हाच व्यवहार बाळासाहेब सुधीरला शिकवून मते मिळतात व मंत्री होतात.

या कथेतील बाळासाहेबच नाहीत तर सुदीर सातपुते सुध्दा भ्रष्ट व्यवहाराचा उपयोग करूनच पुढच्या पायऱ्या चढताना पुढील प्रसंगातून दिसतो.

१. सुधीर बाळासाहेबांच्या ओळखीने जिल्हाध्यक्ष होतो.

२. शिंपी समाजासाठी वेगवेगळे कार्यक्रम राबवून, प्रभावी भाषणे देवून, जातीयतेवर लेख लिहून प्रसिध्द व समाजाचा पाठिंबा मिळवतो.

३. शिंपी समाजाचा सुधीरवर विश्वास बसल्यानंतर त्याच्यासाठी नोकरभरतीत आरक्षण मारण्यासाठी आंदोलन करतो. पण ज्यावेळी बाळासाहेब अंदोलन मागे घेण्यासाठी सुधीरला नोकरी देवू करतात त्यावेळी समाजाशी प्रतारणा करून तो नेकरी स्वीकारतो.

14075
A

४. सुधीरचे निवडणुकीच्या काळात बाळासाहेबांच्या भाचीशी (मृदुलाशी) संबंध निर्माण होतात. त्यामुळे मृदुलाला दिवस गेलेले असतात. पण मृदुलाशी लग्न केले तर त्याचा समाज त्याच्या पासून तुटणार असतो. त्याचे समाजकार्य खुंटणार असते. तरीही तो मृदुलाशी लग्नाला तयार होतो. कारण बाळासाहेबांनी त्याला धमकी दिलेली असते. शिवाय लग्नामुळे त्याला गाडी, बंगला बरोबर सुंदर बायको सुध्दा मिळणार असते.

अशा प्रकारे बाळासाहेब व सुधीर या दोन्ही कार्यकर्त्यांनी भ्रष्ट व्यवहाराचा उपयोग करून आपल्या समाजाचा नाही तर आपलाच फायदा केलेला दिसतो. शिंपी समाज आहे तसाच राहतो. पण बाळासाहेब आमदाराचे मंत्री झालेले असतात व सुधीर सातपुते बेकार असलेला कार्यकर्ता समाजकल्याण खात्याचा मुख्याखिकारी बनलेला असतो. बाळासाहेबांनी सुधीर सातपुतेला पायरीचा दगड बनवलेले असते. तर सुधीरने समाजाल पायरीचा दगड बनवलेले दिसते.

जल्लोश या कथेतील प्रसंगावरून दिसते की भ्रष्ट व्यवहाराला सुरूवात ही कॉलेजच्या निवडणुणीपासूनच होत असते. कॉलेजची निवडणूक म्हणजे तसे मोठे राजकारण नसते.पण मोठ्या राजकीय व्यक्तींच्या पाठिंब्यामुळे या निवडणुकीमध्येही भ्रष्ट व्यवहाराचा वापर होतो व प्राचार्य सारख्या व्यक्तीच भ्रष्टाचार करत असतात व प्रभू मोवाडकर सारखे विद्यार्थी या भ्रष्ट व्यवहाराला विरोध करतात.

१. प्रभू मोवाडकर हुशार बी. कॉम. पहिला आलेला विद्यार्थी असतो. त्याला निवडणुकीतील भ्रष्ट व्यवहार नाहीसा करायचा असतो म्हणून निवडणुकीला उभा राहतो आणि प्राचार्य समता पॅनेलला पाठिंबा द्यावा लागतो म्हणून प्रभूला निवडणुकीतून माघार घेण्यास सांगतात.

२. प्राचार्य, प्राध्यापक प्रभूला निवडणुकीतून बाहेर पडण्यास सांगतात त्यावेळी प्रभू म्हणतो की, आमच्यासारखे हुशार, स्कॉलर विद्यार्थी विद्यापीठाच्या पदव्या घेऊन व्यवहारी जगात मूर्ख ठरतात आणि त्यांचे हात राजकीय पुढाऱ्यांपर्यंत पोहचलेले असतात, ते मात्र थर्ड क्लासमध्ये पास होऊन सुद्धा तात्काळ नोकरी पटकवतात. आम्ही या वाटेनं वाटचाल करुन व्यवहारी जगात का उतरु नये ?[१] असा उलट प्रश्न विचारतो.

३. प्राचार्य निवडणुकीतून अर्ज मागे घेण्याची मुदत संपलेली असतानाही प्रभूने अर्ज मागे घेण्यासाठी मुदत वाढवण्यास तयार असतात. पण प्रभू अर्ज मागे घेत नाही.

४. समता पॅनेलचा सभासद ऑफिसमध्ये मतदान पत्रिकांचा गठ्ठा घेवून जाताना सापडतो. प्रशांत अग्रवालच्या सांगण्यावरुन फक्त तो सभासद समता पॅनेलचा आहे म्हणून प्राचार्य त्याला पोलिसांच्या ताब्यात देण्यास नकार देतात. त्यावेळी यूथ पॅनेलसह प्रभू संप पुकारतो.

५. प्राचार्य प्रभू संप मागे घेत नाही म्हणून निवडणुकीचा निकाल एकमताने समता पॅनेल निवडून आल्याला देतात व यूथ पॅनेलचा संपाचा पाठिंबा काढून घेण्यासाठी यूथ पॅनेलचा उमेदवार हरीश शुक्लाला जमानत देवून सोडवतात. तसेच प्रभूला रस्टिकेट करतात.

६. प्रभू शेवटी रस्टिकेट केले असतानाही प्रचार्यांची माफी न मागता उलट त्यांनी भ्रष्ट व्यवहार वापरला म्हणून त्यांना शिवीगाळ करतो, दंगा करतो. परिणामी प्राचार्य त्याला पोलिसांच्या ताब्यात देतात.

अशा प्रकारे प्रभू मोवाडकर सारखा विद्यार्थी एका छोट्या निवडणुकीतील भ्रष्ट व्यवहार नाहीसा करायला जातो. तरी सुद्धा उध्वस्त होतो. याला प्राचार्य सारखे गुरुच कारणीभूत होत असतात. भ्रष्ट व्यवहाराला हेच लोक खतपाणी घालत असतात. मग हा भ्रष्ट व्यवहार कसा बंद होणार ? असा प्रश्न उपस्थित होतो.

तेथ लव्हाळे राहती या कथेमध्ये धैर्यधर सारखा नीतीभ्रष्ट माणूस स्वत:चे अस्तित्व टिकवण्यसाठी भ्रष्ट व्यवहाराचा उपयोग करतो व सुदामदादा सारखी व्यक्ती शेवटच्या क्षणापर्यंत आपल्या निष्ठा जपण्यासाठी भ्रष्ट व्यवहाराला विरोध करते हे पुढील प्रसंगातून दिसते.

१. सुदामदादा गांधीजींच्या वेळचे स्वातंत्र्य सैनिक असून त्यांच्या निष्ठा राजकीय पद मिळण्यास आड येतात म्हणून ते निष्ठा सोडत नाहीत व त्यांच्या तत्त्वांच्या विरुद्ध चालून आमदार होतो.

२. धैर्यधर सुदामदादांना खासदारांबरोबर जेवणाला आमंत्रण देतो म्हणून सुदामदादा गांधी विरूद्ध अपशब्द ऐकूण घेत नाहीत उलट ते न घाबरता म्हणतात, त्यांनी सुरु केलेली खादी कशाला अंगावर घालता मग? केवळ पक्षाच तिकीट मिळावं, म्हणून ?[१०]

३. धैर्यधर शीला जुनघरे सारख्या मुलीला शिक्षिकेची नोकरी देवून, लग्नाचे वचन देवून तिचा शारीरिक उपयोग करुन घेतो पण ज्यावेळी सुदामदादा त्याला शीलाशी लग्न करण्यास भाग पाडतात त्यावेळी धैर्यधर शीलाचा खून करतो व ती आत्महत्या ठरवतो.

४. सुदामदादा शीलाचा मृत्यु आत्महत्या नसून खून आहे हे सिद्ध करण्यासाठी धैर्यधर व खासदारांना धमकी देवून स्वत:चे आत्मचरित्र लिहितात.

५. सुदामदादा धैर्यधराच्या धमकीला न घाबरता आत्मचरित्र लिहितात. पण धैर्यधर व खासदार बापूसाहेबांचे सर्व भ्रष्ट व्यवहाराचे चित्रण करतात. पण धैर्यधर त्यांच्याच घरातल्या लोकांना अमिष देवून त्यांच्याच विरुद्ध उभे करतो आणि सुदामदादांचा मुलगाच त्यानी लिहलेले आत्मचरित्र जाळून टाकतो.

अशा प्रकारे दोन व्यक्तीरेखा या कथेत आलेल्या आहेत. सुदामदादा हे गांधीवादी, सच्च्या निष्ठा पाळणारे, भ्रष्ट व्यवहाराला विरोध करणारे दिसतात. तर त्यांचाच विद्यार्थी धैर्यधर त्यांच्या विरूद्ध तत्त्वांचा, नितीभ्रष्ट झालेला दिसतो. तो राजकीय जीवनात टिकून राहण्यासाठी कोणताही भ्रष्ट व्यवहार वापरत असतो. सुदामदादा व धैर्यधर मध्ये लढा होता. त्यात धैर्यधर स्वत:च्या भ्रष्ट व्यवहाराने सुदामदादांच्या निष्ठा जाळून

टाकतो आणि सुदामदादांचे अस्तित्व जळून गेले असले तरी ते लव्हाळ्यासारखे भ्रष्अ व्यवहाराच्या महापुरता अजून तग धरुन असतात.

सारांश, वर्तमान कथासंग्रहातील पायरीचा दगड, जल्लोश, तेथ लव्हाळे राहती या कथांमधून राजकीय जीवनातील भ्रष्ट व्यवहाराचे चित्रण आलेले दिसते. पायरीचा दगड या कथेत बाळासाहेब व सुधीर या दोन्ही कार्यकर्त्यांनी भ्रष्ट व्यवहाराचा उपयोग करुन आपल्या समाजाचा नाही तर आपलाच फायदा केलेला दिसतो. शिंपी समाज आहे तसाच राहतो पण बाळासाहेब आमदाराचे मंत्री झालेले असतात व सुधीर सातपुते बेकार असलेला कार्यकर्ता समाजकल्याण खात्याचा मुख्याधिकारी बनलेला असतो. बाळासाहेबांनी सुधीर सातपुतेला पायरीचा दगड बनवलेला असते तर सुधीरने समाजाला पायरीचा दगड बनवलेले असते.

जल्लोश या कथेत प्रभू मोवाडकर सारखा विद्यार्थी एका छोट्या निवडणुकीतील भ्रष्ट व्यवहार नाहीसा करायला जातो तरी सुद्धा उध्वस्त होतो. याला प्राचार्य सारखे गुरुच कारणीभूत होत असतात. भ्रष्ट व्यवहाराला हेच लोक खतपाणी घालत असतात. मग हा भ्रष्ट व्यवहार कसा बंद होणार ? असा प्रश्न उपस्थित होतो.

तेथ लव्हाळे राहती या कथेत सुदामदादा हे गांधीवादी, सच्चा निष्ठा पाळणारे, भ्रष्ट व्यवहाराला विरोध करणारे दिसतात. तर त्यांचाच विद्यार्थी धैर्यधर त्यांच्या विरुद्ध तत्त्वांचा, नीतीभ्रष्ट झालेला दिसतो. तो राजकीय जीवनात टिकून राहण्यासाठी कोणताही भ्रष्ट व्यवहार वापरत असतो. सुदामदादा व धैर्यधर मध्ये लढा होतो त्यात धैर्यधर स्वत:च्या भ्रष्ट व्यवहाराचे सुदामदादांच्या निष्ठा जाळून टाकतो आणि सुदामदादांचे अस्तित्व जळून गेले असले तरी ते लव्हाळ्यासारखे भ्रष्ट व्यवहाराच्या महापुरात अजून तग धरुन असतात.

**२. स्त्री-पुरूष संबंधातील ताणतणाव :-**

स्त्री-पुरूष म्हटले की त्यामध्ये पती-पत्नी, आई-वडील, आई-मुलगा अशी वेगवेगळी नाती येतात. परंतु इथे मात्र विवाह नंतर व विवाह बाह्य स्त्री-पुरूषामधील नातेसंबंध पाहणार आहोत. स्त्री व पुरूष यांच्यामध्ये विवाहबाह्य निर्माण होणाऱ्या नात्यांना समाज मान्यता देत नाही. कारण विवाह हा एकच बंध समाजाला मान्य असतो. नंतर निर्माण होणाऱ्या नात्यांकडे वाईट नजरेतूनच समाज पहात असतो मग ते नाते कितीही पवित्र असले तरी काहीच उपयोग होत नसतो. लग्न सारख्या पवित्र बंधनाने सुद्धा किती तरी पुरूष असमाधानी असतात मग त्यांचे विवाह बाह्य संबंध निर्माण होऊ लागतात व त्याचा दोष मात्र स्त्रीला दिला जातो. त्यामुळे स्त्री पुरूषांमध्ये तणाव निर्माण होऊ लागतात व त्या प्रश्नांना उत्तरे सापडणं कठीण होऊन काही स्त्री-पुरूष संबंध तरी लग्न न करता ही फक्त निष्ठेवर टिकून असलेली दिसतात. अशा नात्यांचे विविध पैलू शोभणेंनी उलगलेले आहेत.

शोभणें यांच्या वर्तमान या कथासंग्रहातील न सापडणारे उत्तर, आपुले मरण, इस शहर में हर शख्स.... या कथांमधून व शहामृग या कथासंग्रहातील महाप्रस्थान, शहामृग या कथांमधून स्त्री-पुरूष संबंधातील ताणतणावाचे चित्रण येते.

न सापडलेले उत्तर या कथेत एका विधवेने लग्न करायचे ठरवल्यानंतर येणाऱ्या प्रश्नांचे चित्रण आले आहे. या कथेमध्ये श्रीधरने अपयशाने आत्महत्या केली म्हणून त्याच्या मृत्युच्या आरोपाखाली भरडून निघालेली त्याची बायको प्रभा व तिची दोन मुले त्यांना आधार वाटतो. तो श्रीधरचा मित्र व्यंकटेशचा. पण समाजाच्या वाईट दृष्टिकोनामुळे व मानसिक-शारीरिक आधारासाठी प्रभा व्यंकटेशशी लग्न करायचे ठरवते. पण प्रभाची मुलगी लीनाला ते मान्य नसते. व्यंकटेश स्वत: आपल्या बायकोपासून असमाधानी असल्याने प्रभाशी लग्नाला तयार होतो. मात्र व्यंकटेशची बायको त्याच्या लग्नाल मान्य करत नाही ती प्रभा जवळ आपलचं दु:ख सांगत राहते. प्रभा शेवटी आपल्या मुली लीनासाठी स्वत:च नकार देते. परत व्यंकटेश व प्रभा हे दोघेही वेगवेगळ्या वाटेने चालू लागतात एकटेच. पण असे आपण जवळ येवून परत लांब का गेलो ? याचे उत्तर मात्र कोणाकडेच नसते.

आपुले मरण या कथेत विवाह झालेल्या स्त्री-पुरूषामधील मैत्रीच्या नात्यामध्ये एखाद्या प्रसंगाने निर्माण होणाऱ्या तणावाचे चित्रण आले आहे. या कथेमध्ये वसंतराव हे एक पेपरमध्ये काम करणारे वार्ताहर असतात व ऑफिसमध्ये ज्येष्ठतेप्रमाणे मुख्य संपादक म्हणून नेमणूक होणार असते. वसंतराव व त्यांच्या पत्नीचे मतभेद होत असतात. त्यामुळे त्यांचे वैवाहिक जीवन सुखी नसते. वसंतराव व जाधव हे चांगले मित्र असतात. जाधवच्या पत्नीने लिहिलेल्या कविता वसंतराव पेपरमध्ये छापत असतात. त्यामुळे वसंतराव व मिसेस जाधव मध्ये मित्रत्वाचे नाते निर्माण होते. त्यांची मैत्री बौद्धिक पातळीवरती असते. पण स्त्री-पुरूष मैत्री हा समाज स्वीकारत नाही. म्हणूनच वसंतरावांची पत्नी या मैत्रीवरुन संशय घेत असते. मि. जाधव कधीही या मैत्रीवर आक्षेप घेत नाहीत. मि. जाधवांच्या गैरहजेरीत देखील वसंतराव मिसेस जाधवांना भेटत असतात. मनातील भावना व्यक्त करत असतात.

वसंतरावांना जेव्हा संपादक पदावरुन डावलून वशिल्याने नाथला संपादक बनवले जाते. तेव्हा वसंतराव दु:खी झालेले असतात त्यातच त्यांच्या पत्नी बरोबर भांडण होते व मुलगाही ते भांडण बघून घरातून हॉस्टेलला निघून जातो. यामुळे दु:खी झालेले वसंतराव मिसेस जाधवकडे भावनावश होतात त्यांना दिलासा देण्यासाठी मिसेस जाधव जवळ जातात. तेव्हा वसंतरावातील पुरूष जागा होतो. परंतु तो क्षण मिसेस जाधव टाळू शकत नाहीत व दोघांमध्ये मोह निर्माण होऊ नये म्हणून वसंतरावाशी दहा वर्षाची मैत्री तोडतात. या सर्वांचा परिणाम असा होतो की वसंतराव नोकरी सोडतात. जीवनाशी निराश होऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न करतात पण जेव्हा मरण समोर दिसायला लागते तेव्हा त्यांना ब्रम्हांड आठवते व आत्महत्येचेही धाडस होत नाही.

इस शहर में हर शख्स.... या कथेत विवाहबाह्य स्त्री-पुरूष संबंध फक्त निष्ठेवर कशी टिकून असतात याचे चित्रण आले आहे. या कथेमध्ये भाईजी हे एक प्रख्यात गायक असतात. त्यांना आई व विभा नावाची मोठी मुलगी असते. पण त्यांची पत्नी जिवंत नसते. त्यांच्याकडे सुशीला ही विभाची मैत्रीण गाणं शिकायला आलेली असते. ती भाईजीच्य व्यक्तिमत्वानं प्रभावित होते व त्यांच्याशी प्रेमाचे अतुट नाते निर्माण करुन सर्व बंधन तोडून त्यांच्याबरोबर रहायला लागतो. भाईजी सुशीलाबरोबर लग्न करणार असतात. तेव्हा त्यांची मुलगी विभा आत्महत्येची धमकी देते. त्यामुळे भाईजी व सुशीला लग्न करु शकत नाहीत पण भाईजी सुशीलाची सर्व जबाबदारी पूर्ण करत असतात. स्वत:चे घर सुद्धा तिला रहायला दिलेले असते. कारण भाईजींची माई व मुलगी विभा जिने स्वत: नवऱ्याला सोडून दिलेले असते ती सुशीलाला फक्त भाईजींची रखेल मानत असतात परंतु सुशीला मात्र स्वत:साठी भाईजीकडून काहीही घेत नाही.

भाईजींचा मृत्यु होतो तेव्हा कावळा शिवत नाही म्हणून सुशीलाला विभा तेराव्याला बोलावते. तीच विभा नंतर सुशीलाला नोटीस पाठवून घर सोडायला सांगते. समाजात नवरा बंधनात ठेवण्यासाठी व सोडण्यासाठी लग्न कायद्याने विश्वासाचे साधन मानले जाते. हे सुशीलाला माहित असूनही प्रेमाखातर व भाईजीखातर लग्न न करता दहा वर्ष राहते आणि भाईजींच्या मृत्युनंतरही कुणाचाही आधार न घेता त्यांच्या आठवणीवर एकटी रहायला लागते. कारण भाईजींचे व सुशीलाचे नाते शरीरधर्म, पैसा, प्रेम या पलीकडचे असते.

महाप्रस्थान या कथेत विवाहबाह्य स्त्री-पुरूषसंबंधातील निष्ठेचे चित्रण आले आहे. या कथेमध्ये श्रीधर महाजन हा एक प्रख्यात आहे त्याने स्वत:च्या घरातील व्यक्तिंवर नाटक, कथा लिहिलेल्या आहेत. पण त्याच्या लेखनात कामवासना, हिंसा, लैंगिकता आणि क्रौर्य याचेच विकृतदर्शन घडवले होते. म्हणूनच त्याच्या घरच्यांनी, नातेवाईकांनी त्याला वाळीत टाकले होते. त्याने लग्नही केले नव्हते. पण जेव्हा त्याचा मृत्यू होतो तेव्हा त्याचा भाऊ सदानंद त्याच्या क्रियाकर्मासाठी जातो. कारण त्याच्या जवळ रडणारे त्याचे असे कोणीच नव्हते, दु:ख व्यक्त करणारे मात्र भरपूर होते. क्रियाकर्मानंतर सदानंद कागदपत्रे पाहतो. त्यावेळी त्याला समजते की वारसदार म्हणून त्याची मुलगी संजीवनीचे नाव लावलेले आहे. ज्या संजीवनीला श्रीधराने फक्त लहान असतानाच पाहिले होते.

सदानंदला दुसऱ्या दिवशी नलिनी दातार नावाची इंग्रजीची प्राध्यापिका भेटायला येते व आपण श्रीधरची प्रेयसी असल्याचे सांगते. ती अविवाहीत होती तरीही तिचे व श्रीधरचे दहा वर्षापासून शारीरिक संबंध होते. पण कधीही त्यांना लग्न करावेसे वाटले नसल्यामुळे त्यांनी लग्न केलेले नसते. त्यांच्यातील नातेसंबंध इतके निस्वार्थी, घट्ट असतात की तिला श्रीधरच्या मृत्यूमुळे एक आधार नाहीसा झाल्याचा भास होतो म्हणून ती सदानंदकडे आधाराच्या अपेक्षेने बघते. श्रीधरच्या मालमत्तेतील तिला काहीही नको असते शिवाय ती सदानंदला मुलाखतीत श्रीधर विषयी चांगलेच सांगण्याची विनंती करते व ज्या वेड्या आत्यावर

नाटक लिहून तिचे विकृत दर्शन घडवून खूप प्रसिद्धी मिळवली त्या आत्याचा मुलगा मुरलीधरला मालमत्तेतील हिस्सा द्यायला सांगते व स्वत:साठी मागते ते फक्त त्यांच्या सगळ्यांकडून प्रेम, माया जिव्हाळा कारण तिला श्रीधरपासून तुटायचे नव्हते व जाताना श्रीधरने पाळलेला कुत्रा घेवून जाते व तो कुत्रा सुद्धा खूप दिवसांचे ऋणानुबंध असल्यासारखा निघून जातो.

प्रत्येक व्यक्ती मृत्युचा हात धरुन महाप्रस्थान करते पण जिवंत अस्तित्वापेक्षा अधिक अस्तित्व मागे सोडून जाते.

शहामृग या कथेत स्त्री पुरूषामध्ये शेवटी आदिम नातेच असते याचे चित्रण आले आहे. या कथेमध्ये आनंदराव हे एका स्थानिक दैनिकात उपसंपादक असून त्यांचा स्वभावधर्म चाकोरीबद्ध नसल्यामुळे त्यांनी आंतरजातीय विवाह केलेला होता. ते पन्नाशीचे होते. शिवाय ते समाजसेवी संघटनेचे सल्लागार व सुत्रधार म्हणून दहा वर्ष काम करत होते. या संघटनेच्या कमलाताई अध्यक्षा असून त्यांनी चाळीशी ओलांडली तरी समाजकार्यासाठी लग्न केलेले नाही.

एके दिवशी पेपरातून मुलीच्या विक्रीची बातमी येते. यातून आनंदरावांना त्यांची पत्नी सुमती त्यांना वेश्या पुनर्वसनाची कल्पना देते व आनंदराव या गोष्टीविषयी मनावर घेवून कमलाताई जवळ ही कल्पना सांगतात. कमलाताईच्या मदतीने आनंदराव त्यांच्या मुलीच्या वयाच्या एका वेश्येचे, किरणचे पुनर्वसन करण्याचे निश्चित करतात. किरणची दुसरीकडे सोय होईपर्यंत आनंदराव आपल्या घरी आसरा देतात. ती जोपर्यंत स्वावलंबी होत नाही तोपर्यंत तिला ते घरी ठेवून घेणार असतात. परंतु किरणमुळे त्यांच्या मुलीच्या विवाहात अडथळा निर्माण होतो. कारण आनंदराव मोठ्या हुशारीने आपल्या वृत्तपत्राचा वापर स्वत:च्या कार्याच्या प्रसिद्धीकरिता करुन घेत असतात. किरणच्या पुनर्वसनाची बातमी प्रसिद्ध झालेली असल्यामुळे अनेक अफवांचा जन्म झालेला असतो या किरणला घरातून बाहेर काढल्याशिवाय नीलमचा विवाह होणार नसतो. नीलम या प्रस्तावाला विरोध करते. पण किरणच तिची समजूत काढते.

किरणच्या सौंदर्याचे आव्हान आनंदरावांना पेलवत नाही संभावित समाजाचे आपण एक घटक आहोत, चाळीशी ओलांडलेल्या स्त्रीचे आपण पती आहोत, एका मुलीचे बाप आहोत या सर्वांचा त्यांना विसर पडतो. कारण अखेर ते एक पुरूष असतात. समाजातले त्यांचे स्थान चारजणांनी टाकलेला त्यांच्यावरचा विश्वास हे सर्व खरे असले तरी किरणपाशी जाताना आदिम नात्यापलीकडे काहीच नाही. याची त्यांना स्वत:ला जाणीव होते.

अशा प्रकारे न सापडलेले उत्तर, आपुले मरण, इस शहर में हर शख्स, महाप्रस्थान व शहामृग या कथांच्या आशयावरुन आपल्याला या कथा स्त्री-पुरूषसंबंधातील ताणतणावाचे चित्र करणाऱ्या आहेत हे समजते तेस घटनाप्रसंगावरुन स्त्री-पुरूषसंबंधातील ताणतणाव दिसून येतो.

न सापडलेले उत्तर या कथेमध्ये प्रभाने व्यंकटेशशी लग्न करायचे ठरल्यापासून लग्नाला नकार देण्यापर्यंत निर्माण झालेल्या ताणतणावांचे चित्र पुढील प्रसंगातून दिसून येते.

१. प्रभाने समाजाच्या वाईट दृष्टिकोनाला तोंड देण्यासाठी तिला मानसिक, शारीरिक आधाराची गरज भासू लागते म्हणून व्यंकटेशशी लग्न करायचे ठरवते. मात्र हा निर्णय प्रभाची मुलगी लीनाला पसंत नसतो. म्हणूनच ती म्हणते, तुला लग्नच करावंसं वाटत असले, तर तू नि:संकोचपणे कर त्याल माझील कुठलीही अडचण नाही; पण मी व्यंकटेशकाकांना बाप म्हणून स्वीकारू शकत नाही.[११]

२. लीना रात्री अपरात्री उठून थंड पाण्याने आंघोळ करायला लागते. डोके आपटून, हुंदके देवून रडू लागते. तिला वाटते की, प्रभाने व्यंकटेशशी लग्न केले तर आपण पोरकं होऊ. लीनाच्या वागण्याचा प्रभाला खूप त्रास होतो. व्यंकटशेही लीनाला खूप समजावतो पण ती समजण्याच्या मन:स्थितीत नसते.

३. एके दिवशी व्यंकटेशची पत्नी शैला येवून प्रभालाच लग्नाविषयी दोषी ठरवते. शैलाचे व व्यंकटेशचे सहा वर्ष शारीरिक संबंध नसतात. त्यामुळे तिला आपले दु:ख प्रभापेक्षा अधिक वाटते. तिने शरीरसुखासाठी व्यंकटेशशी लग्न करुन नये असे तिचे म्हणणे असते. पण प्रभाला हा आरोप मान्य होत नाही ती म्हणते, शैला माझ्यावर हा आरोप करु नकोस; केवळ शरीरसुखासाठी एखादा माणूस जवळ करणारी बाई नाहीय मी. मला व्यंकटेश केवळ या करताच हवा असता, तर मी त्याच्याशी लपून आपले संबंध ठेवले असते, पण मला कुणीतीर भावनिक आधार देणारा माणून हवा होता.[१२]

४. शैला मात्र प्रभाचेक जराही ऐकून न घेता आपलंच उसवलेलं आयुष्य सांगत राहते. प्रभाने जर व्यंकटेशशी लग्न केले तर तिला शैलाचा शाप लागेल असे सांगितल्यावर प्रभा एकच वाक्य सांगते, शैला, दोन स्त्रियांना एकमेकांसमोर उभं केले, तर कोण जास्त दु:ख आहे, हे ठरवताच येणार नाही.[१३]

५. शेवटी प्रभा शैलाच दु:ख आपल्यापेक्षा मोठं आहे असे समजून व्यंकटेशशी लग्न न करण्याचा निर्णय घेते आणि घरी निघून येते. व्यंकटेश व प्रभा परत वेगवेगळ्या वाटेने एकटेच चालू लागतात. पण हे दोघे इतक्या जवळ येवून लांब का गेले ? याचे मात्र उत्तर सापडत नाही.

आपुले मरण या कथेत सुमित्रा जाधव व वसंतराव यांच्या मध्ये दहा वर्षापासून बौद्धिक, भावनिक मैत्री असते ही मैत्री परिस्थितीमुळे ताणतणाव निर्माण होऊन एका मोहाच्या क्षणामुळे तुटते याचे चित्रण पुढील प्रसंगावरुन दिसून येते.

१. वसंतराव व जाधव हे चांगले मित्र असतात. त्यामुळे वसंतरावांची मिसेस जाधवांशी मैत्री होते. पण ही मैत्री बौद्धिक, भावनिक पातळीवरची असते. समाज स्त्री-पुरूषांची बौद्धिक मैत्री मान्य करु शकत नाही म्हणून वसंतरावांची पत्नी ही मैत्री स्वीकारत नाही व त्यांच्यात भांडणे सुरु होतात.

२. वसंतराव आपली पत्नी भावनावर लग्नापासून खूप प्रेम करत असतात. पण त्यांची पत्नी भावना फक्त त्यांच्या मैत्रीमुळे त्यांना समजून घेत नाही म्हणूनच वसंतराव स्वत:चं मन मोकळे करण्यासाठी मिसेस जाधवकडेच जात असतात. मैत्री या नात्याने त्यांना बोलता येत असते व मिस्टर जाधवांचाही त्यावर आक्षेप नसतो.

३. वसंतराव मिसेस जाधवांच्या कविता, कथा आपल्या पेपर मधून छापत असतात त्यामुळे त्यांची मैत्री ऑफिसमध्ये सुद्धा जाहीर असते. म्हणूनच या मैत्रीवर आक्षेप घेवून वसंतरावांची सेवा ज्येष्ठता डावलून दुसऱ्या संपादकाला मुख्य संपादकाचे पद दिले जाते.

४. वसंतरावांची पत्नी या कारणाने त्यांच्याशी भांडते. हे भांडण इतके पराकोटीला जाते की दोघे एकेरीवर येतात व एकमेकांच्या चुका काढायला लागतात. हे भांडण पाहून त्यांचा मुलगा हॉस्टेलला निघून जातो.

५. वसंतराव यामुळे खूपच अस्वस्थ होतात व मन मोकळे करण्यासाठी मिसेस जाधवकडे जातात. त्यांच्या चौकशीने वसंतरावांना आपले अश्रू आवरता येत नाहीत. मिसेस जाधव त्यांना दिलासा देण्यासाठी जवळ जातात. तेव्हा वसंतरावातील पुरूष जागा होतो. दोघेही तो क्षण टाळू शकत नाहीत.

६. वसंतराव व मिसेस जाधव यांच्यामध्ये मोह निर्माण होऊ नये म्हणून त्या वसंतरावांना म्हणतात; वसंतराव, माझ्या दृष्टीनं आपली मैत्री बौद्धिक, भावनिक पातळीवरच अधिक महत्त्वाची आहे, पण आत ही मैत्री त्या पातळीवरुन खाली उतरली ..... वसंतराव, मला वाटतं, आपण आता यानंतर पुन्हा भेटू नये. कारण आपल्या भेटी पुन्हा वारंवार अशात्र होत राहिल्या, तर कदाचित आपण यानंतरचे मोहाचे कुठलेही क्षण टाळू शकणार नाही आणि या क्षणांना पुन्हा बळी पडणं पुढच्या दृष्टीनं फार घातक आहे[१४] इतके बोलून त्या आपली दहा वर्षांची मैत्री तोडतात.

इस शहर में हर शख्स.... या कथेत भाईजींवर असलेल्या प्रेमाखातर त्यांच्या मुलीच्या वयाची सुशीला लग्न न करता त्यांच्यावर असलेल्या निष्ठेपोटी तशीच रहायला लागते. त्यामुळे भाईजींना व सुशीलाला ज्या ताणतणावातून जावे लागते त्याचे चित्रण पुढील प्रसंगातून दिसून येते.

१. भाईजीवर असलेल्या प्रेमाखातर सुशीला त्यांच्याबरोबर लग्न न करता राहू लागते. भाईजींना सुशीलाशी लग्न करायचे असते. पण भाईजींची मुलगी विभा आत्महत्येची धमकी देते. त्यामुळे ते लग्न करु शकत नाहीत व सुशीलाची जबाबदारी सुद्धा नाकारु शकत नाही. यातूनच त्यांना हृदयविकाराने दोन झटके येवून जातात.

२. भाईजींची मुलगी विभा आपल्या नवऱ्याला सोडून घरी रहायला येते व नवऱ्याशी घटस्फोट घ्यायचा विचार करु लागते. सुशीला विभाला असे न करण्यास सांगते. तेव्हा विभा सुशीलाला भाईजींची रखेल म्हणून हिणवते. मात्र सुशीला तेही स्वीकारते.

३. भाईजी हे सर्व सहन करु शकत नाही. त्यांना हृदयविकाराचा झटका येवून निधन पावतात. सुशीला भाईजींच्या अंत्यविधीला जाते ते विभाला आवडत नाही. ती निरोप पाठवते की तिने परत या घरी येवू नये. तिच्या येण्याने नातेवाईक भाईजींच्या चारित्र्याविषयी बोलू लागतील. त्यावर सुशीला म्हणते, भय्या, रखेली आणि बायको यांतला नेमका फरक काय, रे ? माणूस रेखलीशी वेगळा वागतो आणि बायकोशी वेगळा वागतो का ? याचं उत्तर विभाला विचार.[१५]

४. शेवटी विभा भाईजींच्या तेराव्याला कावळा शिवत नाही म्हणून सुशीलाला बोलावते तीच विभा नोटीस पाठवून घर सोडायला सांगते. त्यावेळी कोणतेही आढेवेढे न घेता सुशीला घर सोडून एकटी रहायला लागते. ती स्वत:च्या आईचा सुद्धा आधार नाकारते. ती म्हणते, भाईजीनंतर मी एकदा पोरकी झाले तुझ्या मृत्यूनंतर पुन्हा पोरकी होईन. मग आणखी कुणीतरी मल दया दाखवून पुन्हा असंच पोरकं करील. हे चक्र सुरु होईल. यात माझं स्वतंत्र अस्तित्व मला कुटच जाणवणार नाही.[१६]

महाप्रस्थान या कथेत श्रीधरसारख्या स्वार्थी माणसाला नलिनी सारखी स्त्री लग्न न करताही सर्वस्व देते व श्रीधरच्या मृत्युनंतरही त्याच्याशी एकनिष्ठ राहते. त्याच्याकडून कोणतीही अपेक्षा करीत नाही. नलिनीचे श्रीधरविषयीच्या निष्ठेचे चित्रण पुढील घटनाप्रसंगावरुन दिसून येते.

१. श्रीधरच्या मृत्युची बातमी पेपरमध्ये बघून त्याचा भाऊ सदानंदन त्याच्या क्रियाकर्मासाठी घरी येतो. त्यावेळी सदानंदनला भेटायला नलिनी नावाची प्राध्यापिका येते जी श्रीधरची प्रेयसी असल्याचे सांगते. तिचे व श्रीधरचे दहा वर्षापासून संबंध असून तिने श्रीधरला सर्वस्व दिले होते असे सांगते.

२. सदानंदन नलिनीला इतके सगळे असून लग्न का केले नाही ? म्हणून विचारतो तेव्हा नलिनी म्हणते, लग्न करावं, संसार उभा करावा असं आम्हाला कधी वाटलंच नाही. जे होतं तेच इतकं भरभरुन होतं की त्याच्या पुढं कधी जावंसं वाटलंच नाही. कधी ते पटलंही नाही.[१७]

३. श्रीधरने आपल्या वेड्या आत्यावर नाटक लिहून बरीच प्रसिद्धी मिळवलेली होती. त्या आत्याचा मुलगा मुरलीधर सदानंदकडे श्रीधरच्या मालमत्तेतील हिस्सा मागायला आलेला असतो. नलिनी श्रीधरची प्रेयसी आहे हे मुरलीधरला समजल्यावर तो तिच्याकडे जातो. त्यामुळे नलिनी सदानंदला मुरलीधरचा हिस्सा कोणतेही आढेवेढे न घेता द्यायला सांगते.

४. मुरलीधर नलिनीजवळ मालमत्तेतील हिस्सा मागायला गेला यावरुन सदानंद व मुरलीधरमध्ये वाद होतो. यावेळी सदानंदनला वेगळाच मुरलीधर दिसून येतो. मुरलीधर मात्र काहीहो हिस्सा न घेता निघून जातो. सदानंदनला श्रीधरविषयी मुलाखत द्यायची असते. त्यावेळीही नलिनी सदानंदनला श्रीधरविषयी वाईट न बोलण्यास सांगते.

५. शेवटी सदानंदन जाण्याच्यावेळी नलिनी भेटायला जाते. नलिनी म्हणते, तुम्हा सगळ्यांकडून प्रेम, तुमची माया. तुमचा जिव्हाळा, माझ्यावर भले-बुरे आरोप ठेवून मला तुमच्यापासून-श्रीधरपासून तोडू नका.[१८] इतके बोलून श्रीधरने पाळलेला कुत्रा घेवून निघून जाते.

शहामृग या कथेत आनंदरावसारख्या पन्नाशी गाठलेला माणूस वेश्या पुनर्वसनासाठी आणलेल्या किरणबरोबर शारीरिक संबंध ठेवायला तयार होतो. ती आपल्या मुलीच्या वयाची आहे याचाही त्यांना विसर पडतो. अशा वेळी आनंदराव व किरणमध्ये आदित नात्यापलीकडे काहीच नसते ते पुढील घटनाप्रसंगावरुन दिसून येते.

१. आनंदरावांना त्यांची पत्नी सुमती मुलीच्या विक्रीची बातमी वाचून वेश्या पुनर्वसनाची कल्पना देते. आनंदराव समाजसेवी संघटनेचे सल्लागार व सुत्रधार असल्याने हे मनावर घेतात आणि संघटनेच्या अध्यक्षा कमलाताईंना घेवून किरण नावाच्या वेश्येचे पुनर्वसन करायचे ठरवतात. ती दिसायला चांगली असते. थोडीफार शिकलेली असते. तिची वेश्या व्यवसायातून बाहेर पडायची तयारी असते.

२. आनंदराव किरणची दुसरीकडे व्यवस्था होईपर्यंत घरीच आणायचे ठरवतात. आनंदरावांची मुलगी नीलम किरणच्याच वयाची असते. ती पुनवर्सनाविषयी विचारते तेव्हा आनंदराव म्हणतात, पुनर्वसन म्हणजे तिला तिच्या जुन्या जीवनापासून, कामापासून परावृत्त करणे आणि नव्यानं जीवनाला प्रारंभ करणे.[१९]

३. सुमतीच्या समत्तीने आनंदराव किरणला घरी आणतात. किरणची पुनर्वसनाची बातमी व लेख लिहून संघटनेला प्रसिद्धी मिळवून देतात. किरणशी घरात सुमतीची व नीलमची चांगले जमते. नीलम किरणला शुद्ध बोलायला सांगते. खालचा ओठ मुडपून बोलायची सवय वाईट असून तसे न करण्यास सांगते.

४. किरणला रहायला येवून आठ दिवस होतात. पण तिची व्यवस्था बाहेर होत नाही तोपर्यंत नीलमच्या लग्नाची बोलणी चालू होते. मुलगा नीलमला पसंत करतो. लग्नाल किरणमुळे अडथळा निर्माण व्हायला लागतो. म्हणून कमलाताईंना विचारुन आनंदराव नीलमच्या लग्नासाठी किरणाला बाहेर खोली घेवून ठेवायचे ठरवतात. पण नीलम किरणला एकटीला ठेवायला तयार नसते. त्यावेळी किरण म्हणते, नीलमताई, तुझ्या बोलण्याचं हसायला आलं. वयाच्या सत्राव्या वर्षापासून मी एकटी राहते. इथं या शहरात एकटी राहते. बाईला भीती मान्सापासून नं ? मी जिंदगीत अनेक माणसं पाह्यली कुत्र्या-मांजरावानी मी मान्सांना खेळवते .... तू अजून दुनिया पाह्यलीच नाही. आई-बापाच्या मायेखाली वाढलीस नं म्हणून दुःख कसं अस्तं, तुला कसं ठाऊक असनारं ? म्हणून तुझ्यासारख्या पोरीला मुंगी चावायची भीती. आमी फना उगारलेल्या सापच हातात धरतो.[२०] मग किरणला बाहेर ठेवायचे ठरवले जाते.

५. दुसऱ्या दिवशी पहाटे आनंदरावांना जाग येते. तेव्हा शेजारी झोपलेल्या सुमतीचा स्थूलपणा त्यांना जाणवतो. ती पूर्वीसारखी शारीरिक सुख घेण्यास उत्सुक नसते. हे सुद्धा जाणवू लागते. अलीकडे सुमती झोपेच्या गोळ्या घेवून झोपते हे माहित असल्याने ते हॉलमध्ये येतात तिथे किरण अस्ताव्यस्त कपड्यात झोपलेली असते. तिला पाहून त्यांच्या वासना पेट घेतात. त्यांच्यातील पुरूष जागा होतो. ते किरणच्या जवळ जातात. तेव्हा किरण त्यांना विरोध करत नाही त्यामुळे त्यांच्यात शारीरिक संबंध निर्माण होतात आणि आनंदराव विसरुन जातात की किरण आपल्या मुलीच्या वयाची आहे. आपण समाजसेवक आहोत. पुढे किरणला खोली बघून आनंदराव ठेवतात. पण किरणचे पुनर्वसन होण्याऐवजी आनंदराव तिच्या आहारी जातात आणि तिच्याबरोबर शारीरिक संबंध ठेवून राहतात. त्यांच्यामध्ये आदिम नात्यापलीकडे काहीच नसते.

सारांश, वर्तमान या कथासंग्रहातील न सापडलेले उत्तर, आपुले मरण, इस शहर में हर शख्स .... या कथांमधून व शहामृग या कथासंग्रहातील महाप्रस्थान, शहामृग या कथांमधून स्त्री-पुरूषसंबंधातील ताणतणावाचे चित्रण येते. न सापडलेले उत्तर या कथेमध्ये प्रभा व व्यंकटेश परिस्थितीला कंटाळून जवळ येतात पण निर्माण झालेल्या ताणतणावामुळे प्रभा घेतलेला लग्नाचा निर्णय बदलते. प्रभाच्या व्यंकटेशबरोबर लग्न न करण्याने व्यंकटेश शैलाबरोबर प्रेमाने वागेल असे नसते व प्रभाला समाजाच्या वाईट दृष्टिला तोंड द्यावे लागणार नाही असेही नसते मग हे दोघे इतक्या जवळ येवून लांब का जातात ? याचे मात्र खरोखरच उत्तर सापडत नाही.

आपुले मरण या कथेत वसंतराव व मिसेस जाधव यांची दहा वर्षांची असलेली मैत्री व यामुळे निर्माण झालेले ताणतणाव; त्यातच भावनिक पातळीवर आलेला मोहाचा क्षण न टाळू शकल्यामुळे वसंतरावाशी मिसेस जाधव मैत्री तोडून टाकतात. आपला समाज स्त्री-पुरूष मैत्री स्वीकारु शकत नाही. म्हणूनच स्त्री-पुरूषाने मैत्रीमध्ये मर्यादा ठेवणे गरजेचे आहे. या मर्यादा कधीही ओलांडू नयेत. नाहीतर वसंतराव व मिसेस जाधव सारखी बोद्धिक पातळीवरची मैत्री सुद्धा दहा वर्षानीही तुटून जाते.

इस शहरमें हर शख्स .... या कथेत भाईजींच्याबरोबर त्यांच्या मुलीच्या वयाची सुशीला लग्न न करता निष्ठेवर राहते. भाईजींच्या व सुशीलाच्या या संबंधामुळे त्यांना ज्या ताणतणावातून जावे लागते याचे चित्रण या कथेतून आले आहे. काही नातेसंबंध फक्त निष्ठेवर टिकून असतात हेच या कथेतून दिसते.

महाप्रस्थान या कथेत श्रीधर व नलिनीचे अनअपेक्षितपणे संबंध जुळतात व हे नातेसंबंध श्रीधरच्या मृत्युनंतरही नलिनी टिकवून ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न करताना दिसते. श्रीधर व नलिनीचे लग्न झालेले नसते पण निष्ठा असते, प्रेम असते, जिव्हाळा असतो. याचेच चित्रण या कथेत येते.

शहामृग या कथेत आनंदराव पन्नाशीचे प्रतिष्ठित शिकलेले, सुज्ञ व्यक्ती असूनही ज्यावेळी वासना, शरीरसुख या गोष्टी येतात तेव्हा फक्त ते पुरूष असतात व आपल्या मुलीच्या वयाची किरण फक्त स्त्री असते. त्यामुळे आनंदरावांचे किरणशी आदिम नात्यापलीकडे काहीच नाही हे या कथेतून दिसून येते.

**३. वृत्तपत्रीय जगतातील अनीतिमानता:-**

आजचे युग दुरदर्शन, कॉम्प्युटरचे असले तरी वृत्तपत्राचे स्थान अटळ आहे. आजही लोकांचा वृत्तपत्रावर विश्वास आहे. वृत्तपत्रातील येणाऱ्या बातम्या सर्व सत्य असतात. अशी लोकांची समजूत आहे. पण बऱ्याच वेळा सत्य बाजूलाच राहते आणि असत्यच छापले जाते. त्यामुळे सामान्य लोकांना बऱ्याच संकटांना तोंड द्यावे लागते. शिवाय आता वृत्तपत्रामध्येही राजकारणाचा समावेश झालेला दिसतो. त्यामुळे संपादकांनाही सत्य छापणे कठीण झालेले आहे. काही वृत्तपत्रीय जगतातील प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम शोभणेंनी आपल्या कथेतून केलेले आहे.

शोभणे यांच्या वर्तमान या कथासंग्रहातील हकनाक व सत्य या कथांमधून वृत्तपत्रीय जगतातील अनीतिमानतेचे चित्रण येते.

सत्य या कथेत निरंजन काकडे हा पत्रकार असतो व त्याने रामदास भगतच्या मृत्युची बातमी छापलेली असते. रामदास भगत हा एक स्वातंत्र्यसैनिकाचा मुलगा असून विरोधी राजकीय पार्टीचा सभासद होता, वार्डाचा तो नगरपालिका सदस्यही होता व काही काळाने तो स्वत:ची निवडणूक लढवून महापौर होण्याची शक्यता होती. शिवाय लेर युनियनचा सेक्रेटरी असल्याने कामगारांत त्याला तितकाच मान होता. पण मध्येच त्याचा झाला व तो मृत्यू अपघाती ठरवला गेला होता. एके दिवशी मिसेस भगत पत्रकार काकडेकडे येतात व आपल्या पती**चा** मृत्यू अपघा**ती** झालेला नसून त्यांचा खून झाला असल्याचे सांगतात आणि त्याचे सबळ पुरावे देतात. काकडे त्या आधारावर पूर्ण सत्य माहिती गोळा करतात ती माहिती मिळवल्यानंतर लक्षात येते की यात बऱ्याच मोठमोठ्या लोकांचे हात अडकलेले आहेत. पण हे सत्य पत्रकार काकडेना छापण्यास मनाई केली जाते. संपादकांना वरुन ही बातमी न छापण्याबद्दल आदेश आलेला असतो. संपादक काकडेंना नोकरी जाण्याची व जीवाची भीती दाखवल्याने लिहिलेले सत्य काकडे फाडून टाकतात आणि एक प्रखर सत्य, सत्य असूनही छापखान्यातच दबून पडून राहते. मिसेस भगतना न्याय मिळू शकत नाही हेही सत्य काकडे फक्त निर्वीकारपणे बघत राहतात.

हकनाक या कथेत आनंद झाडगावकर हे संस्कृतचे प्राध्यापक आहेत. एकदा प्राध्यापकांची तब्बेत बरी नसल्याने औषधासाठी स्कुटरवरुन चालले असताना वाटेतच त्यांना भोवळ येते म्हणून रस्त्याकडेला स्कुटर आडवी टाकून तिथल्या झाडाला टेकून कलंडतात त्यामुळे रस्त्यावरच्या लोकांची गर्दी जमते व या गर्दीतीलच एक वार्ताहर सत्य जाणून न घेता आपल्या पेपरच्या पहिल्या पानांवर बातमी छापतो की, एक

संभावित प्राध्यापक दारु पिऊन रस्त्यात आडवे .... या बातमीमुळे संशय घेवून कॉलेजमध्ये कार्यवाही केली जाते. प्रा. झाडगावकरांच्या घात बायको मुलीवर सुद्धा याचा परिणाम झालेला दिसून येतो. जेव्हा प्रा. झाडगावकर प्रेसमध्ये ही बातमी खोटी असल्याचे पुरावे घेवून जातात तेव्हा माफीची बातमी दुसऱ्याच पेपरात छापली जाते. प्रेसविरुद्ध कोर्टात मानहानीचा दावा करण्यासाठी झाडगावकरांना एक वकील सुद्धा मिळत नाही. पण कॉलेज संस्थाप्रमुख मात्र झाडगावकरांना लवकरात लवकर याविषयी पुरावे सादर करण्यास सांगतात. नाही तर नोकरीवरुन बरखास्त करण्याची सूचना देतात. तेव्हा हताश झालेले झाडगावकर या सामाजिक व्यवस्थेला हकनाक बळी पडलेले दिसून येतात.

अशा प्रकारे सत्य व हकनाक या कथांच्या आशयावरुन या कथा वृत्तपत्रीय जगतातील अनीतिमानतेचे चित्रण करणाऱ्या आहेत हे समजते. तसे त्यातील घटनाप्रसंगावरुन वृत्तपत्रीय जगतातील अनीतिमानता दिसून येते.

सत्य या कथेमध्ये पत्रकार काकडे रामदास भगतच्या मृत्यूचे सत्य छापून मिसेस भगतला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करतो पण वरुन आलेल्या दबावामुळे सत्य छापू शकत नाहीत. या अनीतिमानतेचे चित्रण पुढील घटना प्रसंगावरुन दिसून येते.

१. निरंजन काकडे पत्रकार आहे व तो रामदास भगतचा अपघाती मृत्यू झाल्याची बातमी छापतो. त्यानंतर वृत्तपत्र कचेरीत रामदास भगतची बायको काकडेला भगतचा मृत्यू अपघाती नसून खून झाला आहे असे सांगते. त्यासाठी ती पुरावे द्यायला सुद्धा तयार असते आणि नवऱ्याच्या खूनाची बातमी पेपरमध्ये छापून तिला न्याय मिळवून द्यावा अशी तिची इच्छा असते.

२. काकडे मिसेस भगतच्या घरी जातो. त्याच्याकडून रामदासची माहिती व खूनाचे पुरावे मिळतात. काकडेना रामदास डाव्या विचारसरणीचा पुरस्कर्ता, कामगार चळवळीशी त्याचा संबंध असल्याने त्याचा खून झाला असावा असे वाटते. म्हणून रामदासच्या खूनाचे ठिकाण, त्याच्याशी कोणाकोणाचे झालेले भांडण, तो कुठून निघाला, कशा प्रकारे अज्ञात लोकांनी पाठलाग केला. ही सर्व माहिती फॅक्टरीचा वॉचमन, कामगार तसेच पानाचा ठेलेवाला याच्याकडून मिळवतो.

३. काकडे सर्व गोळा केलेली माहिती मिसेस भगताना दाखवतो व छापण्याचे आश्वासन देवून अगदी उत्साहाने प्रेसमध्ये ती बातमी घेवून जातो. पण तिथे संपादक ती बातमी प्रकाशित करण्यास मनाई करतात. ते म्हणतात, कशाला या फंदात पडून स्वतःच्या पायांवर दगड पाडून घेता, काकडे ? टेलिप्रिअरच्या बातम्या काय कमी आहे? त्याच भाषांतरित करुन पेपर भरवा. आपल्याला नोकरी करायची आहे. [२१]

४. काकडेना नोकरीला मुकावं लागेल, अथवा त्यांचाही खून केला जाईल. मग आपली पत्नी ही मिसेस भगत सारखी भटकेल. या विचाराने घाबरुन काकडे लिहिलेली बातमी फाडून कचऱ्याच्या टोपलीत टाकून देतात आणि सत्य सत्य असूनही असत्यच राहते. मिसेस भगत आल्यानंतर त्यांच्या डोळ्याला डोळा देण्याची हिम्मत काकडेना होत नाही. ते निर्वीकार होऊन फक्त ताठ मानेनं जाणाऱ्या मिसेस भगतकडे पहात राहतात.

हकनाक या कथेमध्ये प्रा. झाडगावकरांविषयी छापलेल्या चूकीच्या बातमीमुळे अनेक संकटांना त्यांना तोंड द्यावे लागते. वृत्तपत्राच्या या अनीतिमानतेचे चित्रण पुढील घटनाप्रसंगावरुन दिसून येते.

१. आनंद झाडगावकर हे संस्कृतचे प्राध्यापक आहेत. त्यांची तब्बेत बरी नाही. ते स्कुटर घेवून औषधाला घरातून निघतात. पण वाटेतच त्यांना भोवळ येते. म्हणून ते स्कुटर रस्त्याकडेला आडवी लावून तिथेच झाडाला टेकून कलंडतात. पण त्यांना कुणीतरी मदत करावी म्हणून जाणाऱ्याकडे अपेक्षेने पहातात. त्यांचाच एक विद्यार्थी त्यांना ओळखून थांबतो व विचारतो. प्रा. झाडगावकर त्याला सर्व सांगतात तेवढ्यात तिथे आणखी गर्दी होते आणि प्राध्यापकांना डॉक्टरकडे पोहचवले जाते.

२. दुसऱ्या दिवशी पेपर मधून पहिल्या पानावर बातमी येते की, एक संभावित प्राध्यापक दारु पिऊन रस्त्यात आडवे....[२२] या बामती मुळे प्रा. झाडगावकर अस्वस्थ होतात आणि वृत्तपत्र विभागात जावून संपादकाला म्हणतात, हे बघा साहेब, तुमच्या हातात वृत्तपत्रासारखं महत्त्वाचं माध्यम आहे, म्हणून तुम्ही कुणाचीही अब्रू अशी वेशीवर टांगू शकत नाही. समजलता काय ?[२३] आणि त्यांना आपण आजारी असल्याचे पुरावे देतात. संपादक सगळं ऐकून पेपरातून त्यांच्या बातमीची क्षमा मागायला तयार होतात.

३. बरेच दिवस पेपरमधून बातमीची क्षमा मागितली जात नाही. तोपर्यंत लोक सुद्धा प्रा झाडगावकरांना वाईट नजरेतून बघू लागतात. त्यांच्या मुलीला सुद्धा मित्र मैत्रिणी त्या बातमी बद्दल उलटसुलट विचारतात. म्हणून ती बी. एस्सीचा पेपर तसाच टाकून येते. नंतर कॉलेजमधून सुद्धा प्रा. झाडगावकरांना चारित्र्य निष्कलंक असल्याचा पुरावा सादर करण्यास सांगितले जाते.

४. प्रा. झाडगावकर पेपरमध्ये बामती आली नाही म्हणून परत वृत्तपत्र कचेरीत जातात. तिथे त्यांना समजते की क्षमेची बातमी खेड्यातल्या पेपर मध्ये छापली गेली आहे. मग परत प्रा. झाडगावकर संपादकाशी भांडतात की, वृत्तपत्र सर्वसामान्य माणसावरील अन्याय निवारण्याकरिता आहे, की त्याच्यावर अन्याय करण्याकरिता आहे .... तुम्हाला क्षुल्लक वाटणारी ही चूक माझ्या जीवनाशी क्रूरपणे खेळत आहे, त्याचं काय ?[२४] पेपरच्या पहिल्या पानावर क्षमेची बातमी छापण्यास सांगून शेवटी कोर्टात जाण्याची भाषा करुन निघून येतात.

५. कॉलेज कौन्सिलमध्ये प्रा. झाडगावकर सर्व घडलेली हकीकत सांगतात. तरीही त्यांना फक्त आठ दिवसांची अर्ज देण्याची मुदत दिली जाते मग ते वकील मिश्रांकडे जातात. मिश्रा अब्रु नुकसानीचा दावा करण्यास तयार होतात. पण तेही एक दिवस वकीलपत्र घेतात. प्रा. झाडगावकर प्रसिद्धी विभाग, मुख्यमंत्री, राज्यपाल, कमिशनर, कलेक्टर या सगळ्यांना पत्र लिहितात आणि वृत्तपत्र कचेरी समोर आमरण उपोषणाला बसतात.

सारांश, वर्तमान या कथासंग्रहातील सत्य व हकनाक या दोन कथांमधून वृत्तपत्रीय जगतातील अनीतिमानता चित्रित झालेली आहे. सत्य या कथेमध्ये निरंजन काकडेसारखे वार्ताहर सुद्धा सत्य माहीत असूनही नपुंसक बनून जातात. आज वार्ताहर फक्त नोकरीचा गुलाम बनून राहिला आहे. संपादक जी बातमी सांगतील तीच छापली जाते आणि संपादकाच्या वरचे लोक सांगतील ते संपाकद ऐकत असतो. या अनीतिमानेमुळेच रामदास भगतचा खून झाला आहे या गोष्टीला वाचाच फोडली जात नाही व मिसेस भगतला न्याय मिळत नाही याचे चित्रण केले आहे.

हकनाक या कथेत प्रा. झाडगावकर काहीही कारण नसताना वृत्तपत्रातील छापलेल्या बातमीने हैराण होतात. त्यांना खूप मानसिक त्रास सोसावा लागतो. हकनाक अनेक संकटांना तोंड द्यावे लागते वृत्तपत्रातील एक चूक सुद्धा सामान्य व्यक्तिचे जीवन पूर्ण बदलून टाकते याचे चित्रण येते.

**४. मानसिक दमनातून निर्माण झालेली विकृती:-**

माणसाला शारीरिक व मानसिक असे दोन्ही प्रकारचे रोग होत असतात. शारीरिक रोग दिसून येतात. मानसिक रोग मात्र दिसून येत नाहीत. एखादी व्यक्ती आपल्यातील इच्छा, वासना दाबून ठेवते तेव्हा काही काळाने त्याचे विकृतीत रूपांतर होते. ती व्यक्ती विकृत आहे असे वाटत नसते पण क्वचित तीच व्यक्ती विकृत वागत असते. कारण त्या व्यक्तीचा आपल्या इच्छा, वासनावर ताबाच रहात नाही. अशाच विकृतीचे चित्रण शोभणे आपल्या एका कथेतून करतात.

शोभणे यांच्या शहामृग या कथासंग्रहातील केसाळ कातडीचे श्वापद या कथेतून मानसिक दमनातून निर्माण झालेल्या विकृतीचे चित्रण दिसून येते.

केसाळ कातडीचे श्वापद या कथेत वेणू जगताप ही विवाहाचे वय उलटून गेलेली शिक्षिका असते. तिच्यावर घरातील जबाबदारी असल्याने लग्न केलेले नसते. नंतर तिच्याच बहिणीच्या नवऱ्याने तिच्यावर बलात्कार केल्याने तिने कधी लग्नाचा विचार केला नाही. पण चाळीशीनंतर तिच्या मनातील वासना एका केसाळ कातडीच्या श्वापदाचे रूप घेऊन रोज रात्री तिच्यावर चाल करुन येत असतात. मनातल्या वासना तिला स्वस्थ बसू देत नाहीत. माधव हा तिच्यापेक्षा वयाने लहान, तिच्या घरी राहणार पेईंग गेस्ट पण त्यालाही हे केसाळ कातडीचे श्वापद एके दिवशी वेणूला आधीन करुन घ्यायला भाग पाडते.

मृदंगाच्या आवाजाने हे श्वापद जागृत होते व त्या आवाजातच वेणू रमून जात असते. मात्र हे श्वापद दिवसेंदिवस अधिकच आक्रमक होत जाते. वेणूला राजू नावाच्या विद्यार्थ्याची विधवा आई भेटायला येते. त्यावेळी वेणूला वाटते की त्या बाईला आपल्यासारखे श्वापद दमवत असेल का ? असे प्रश्न मनात येवू लागतात. मृदंग कडवणारा भणंग जोगी येतो तेव्हा वेणू त्याला केसाळ कातडीच्या श्वापदाविषयी सांगते. जोगी वेणूला हे श्वापद षडरिपूंपासून तयार झालेले असते व ते सर्वांमध्ये असते. आपण जर षड्रिपूंचा पराभव केला तर हे श्वापद मरुन पडते असे सांगतो. पण वेणूला ते जमन नाही. एके दिवशी हे श्वापद राजू सारख्या लहान मुलावर झडप घालण्यास वेणूला प्रवृत्त करते. अखेर वेणू निग्रहाने स्वतःतील या श्वापदाचा नाश करते. त्या दिवशी तिला मोकळे मोकळे वाटते.

अशा प्रकारे केसाळ कातडीचे श्वापद या कथेच्या आशयावरुन आपल्याला या कथेतील मानसिक दमनातून निर्माण झालेली विकृतीचे चित्रण आलेले आहे हे समजते. तसे घटनाप्रसंगावरुन मानसिक दमनातून निर्माण झालेली विकृती दिसून येते.

१. वेणू जगताप ही अविवाहीत शिक्षिका आहे. ती शाळेतून घरी जात असताना राधाकृष्णाच्या मंदिराजवळ मृदंगाच्या आवाजाने थांबते. त्या आवाजाने तिच्यातील वासनाचे केसाळ कातडीचे श्वापद जागृत होते म्हणून ती मृदंगाची कॅसेट विकत घेते व ती आपल्याच घरात पेईंग गेस्ट म्हणून राहिलेला व तिच्या पेक्षा लहान असलेल्या माधवला ऐकवते त्यावेळी माधवला वेणू एकाकीपणामुळे मानसिक संतुलन बिघडवून घेईल अशी शंका येते.

२. वेणू मधील हे केसाळ कातडीचे श्वापद रात्रीचे जागृत होते तेव्हा ती माधवच्या खोलीत जाते व त्याला आपल्या आधीन करुन घेते आणि आपल्यातील वासन क्षमवून त्या श्वापदाला शांत करते.

३. वेणू माधवला व तिच्या प्रेयसीला बघते. त्यावेळी माधवला आपणही घरच्या जबाबदाऱ्यामुळे लग्न न केल्याचे सांगते. स्वतःच्या लहान बहिणीचे लग्न लावून दिल्यानंतर तिच्याच नवऱ्याने तिचा फायदा उठवल्याचे सांगते. आता चाळीशी ओलांडल्यामुळे लग्न करणेही शक्य नाही. त्यामुळेच वेणू एकाकीपणाचे जीवन जगत असते व वासनाचे श्वापद रोज रात्री तिच्या उरावर येवून बसत असते.

४. वेणूच्या शाळेतील लहान मुलगा घेऊन त्याची विधवा आई तिच्याकडे शिकवणी लावण्यास येते. त्यावेळी ती वेणूला आपल्या सासऱ्याचीच आपल्यावर कुदृष्टी असल्याचे सांगते. म्हणून ती रोज रात्री उशाखाली चाकू घेऊन झोपत आहे असे सांगते. त्यावेळी वेणूला वाटून जाते की आपल्यासारखे श्वापद हिच्यात नसेल का ?

५. एके दिवशी मृदंग वाजवणारा भणंग जोगी वेणूच्या दारात भिक्षा मागायला येतो तेव्हा ती त्याला भिक्षा देवून आपल्यातील केसाळ कातडीच्या श्वापदाविषयी सांगते. तो जोगी हे केसाळ कातडीचे श्वापद

सगळ्यात असून ते षड्रिपूंपासून तयार झालेले असते. आपण षड्रिपूंचा पराभव केला की ते श्वापद मरुन पडते असे सांगतो.

६. वेणूतील केसाळ कातडीचे श्वापद दिवसेंदिवस आक्रमक होत जाते. राजूवर सुद्धा ते झडप घालायला वेणूला प्रवृत्त करते. ती राजूला जवळ घेवून आपले स्तन पाजायचा प्रयत्न करते. त्यावेळी राजू तिला घाबरुन निघून जातो. वेणू मृदंगची कॅसेट लावते आणि आपल्या वासना शमवण्याचा प्रयत्न करते. शेवटी वेणू निग्रहाने स्वत:तील या श्वापदाचा नाश करते. त्यादिवशी तिला मोकळे मोकळे वाटते.

सारांश, वर्तमान या कथासंग्रहातील केसाळ कातडीचे श्वापद या कथेतून मानसिक दमनातून निर्माण झालेली विकृतीचे चित्रण आलेले आहे. केसाळ कातडीचे श्वापद या कथेत वेणू जगताप ही मानसिक विकृती निर्माण झालेली चाळीशी ओलांडलेली अविवाहिता असते. तिच्या वासनांनी केसाळ कातडीच्या श्वापदाचे रूप धारण केलेले असते व ज्या ज्या वेळी केसाळ कातडीचे श्वापद जागृत होईल त्या त्या वेळी वेणू माधव सारख्या तरुणाला, राजू सारख्या लहान मुलाला जवळ घेऊन आपल्या वासना शमवण्याचा प्रयत्न करत असते. वेणूतील या विकृतीचे चित्रण यात येते.

**५. समाज सुधारणेतील बेगडीपणा :-**

आज समजासुधारणेच्या किती तरी संस्था दिसतात. पूर्वीपेक्षा त्याचे स्वरुप फक्त बदललेले आहे. पूर्वी समाजसुधारणा करणारे समाजसुधारक स्वत:ला त्यात झोकून देत असत. आज मात्र समाजसुधारणेच्या नावाखाली किती तरी प्रयोग केले जातात. त्यात मात्र निष्पाप लोकांचा बळी जातो व समाजसुधारक प्रसिद्धी मिळवतात. पण जेव्हा समाजसुधारणेतील बेगडीपणा लक्षात येतो तेव्हा त्या सुधारणावादाच्या विरोधात बळी पडलेले लोकच उभे राहतात. समाजसुधारणेतील बेगडीपणाचे चित्रण शोभणेंनी आपल्या कथेतून केलेले आहे.

शोभणे यांच्या शहामृग या कथासंग्रहातील सती आणि महात्मा या कथेतून समाज सुधारणेतील बेगडीपणाचे चित्रण दिसून येते.

सती आणि महात्मा या कथेतील कल्याणी ही सुसंस्कृत घरातील असते. तिचे आजोबा हे स्वातंत्र्या सैनिक आहेत. त्यामुळे त्यांच्या घरात समाजसुधारणेला महत्त्व असते. कल्याणी समाजशास्त्र विषयात एम. ए. झालेली असते. पण ती कृतिशीलतेला प्राधान्य देत असते. म्हणूनच कल्याणी नानाचे मित्र आचार्य यांच्याकडे अनाथाश्रमात मुलांना शिकवायला जात असते. कल्याणी आचार्यांच्या विचारांनी प्रभावी होते. तळागाळातील माणसांना सुधारण्यासाठी त्यांच्या सुसंस्कृत, सुशिक्षित तरुणीने विवाह करणे या समाजातील विषमता हटविण्यासाठी कसे पोषक आहे हा आचार्यांचा विचार कल्याणीच्या डोक्यात घट्टपणे असतो आणि ती भीमासारख्या साध्या मजुराशी लग्न करण्याचा निर्णय घेते. तिचा हा निर्णय सुधारणावादी आजी

आजोबांना, आई-बाबांनाही धक्कादायक आणि दु:खद वाटतो पण ते तिला अडवू शकत नाहीत. शिवाय तिचा प्रियकर चंदूही दु:खी होतो.

विवाहानंतर कल्याणी ज्या दिव्यातून जाते, ज्या यातना सहन करते त्यातून ती तावून सुलाखून निघते. तेव्हा आपले पाय जमिनीवर आणावे लागतात. मग कल्याणी या सुधारणावादाच्या विरोधात उभी राहते. सुधारणावाद, सुधारणावादाच्या ध्येयाने प्रेरित होऊन होणारे प्रेमविवाह त्या प्रेमविवाहातील प्रेम आणि वासना यातील अंतर अनेक अंगाने ती आपल्याच आजी-आजोबा, आई-बाबांच्या जीवनाचा शोध घेऊ लागते. तिला जाणवते की, सुधारणावादासाठी स्वीकारलेली कृतिशीलता या सर्व गोष्टी खोट्या आहेत. आचार्य मात्र कृतिशील सुधारणावादाचा आपला प्रयत्न कल्याणीच्या निमित्ताने असफल ठरला म्हणून भीमाशी आपल्या अनाथालयातील उषा नावाच्या मुलीचे पुन्हा लग्न लावून आपल्या प्रयोगातील त्रुटी सुधारू पाहण्याचा प्रयत्न करतात. तेव्हा त्याच आचार्यांच्या या प्रवृत्तीविरूद्ध जिद्दीने कल्याणी उभी राहते व उषाला दत्तक घेवून जाते.

अशा प्रकारे सती आणि महात्मा या कथेच्या आशयावरून आपल्याला या कथेतील समाजसुधारणेतील बेडीपणाचे चित्रण आलेले आहे हे समजते तसे घटना प्रसंगावरून समाज सुधारणेतील बेगडीपणा दिसून येतो.

१. कल्याणी भीमाच्या घरातून रात्रीच पळून नागपूरच्या बसने यायला निघते आणि वाटेत तिला स्वत: भीमाशी कोणत्या वेडापायी लग्न केले ते आठवू लागते. कल्याणी ही समाजशास्त्र विषयात एम. ए. झालेली असते. तिला समाजसेवा करण्याची इच्छा असते व ती कृतिशीलतेचा पुरस्कार करत असते. म्हणून आजोबांचे मित्र आचार्य यांच्या अनाथाश्रमात मुलांना शिकवायला जाऊ लागते. तळागाळातील माणसांना सुधारण्यासाठी त्यांच्याशी सुसंस्कृत, सुशिक्षित तरुणीने विवाह करणे या समाजातील विषमता हटविण्यासाठी कसे पोषक आहे हा आचार्यांचा विचार कल्याणीच्या डोक्यात घट्टपणे बसतो आणि तो भीमासारख्या साध्या मजुराशी लग्न करते.

२. कल्याणीचे चंदूवर प्रेम असून कृतिशीलतेसाठी व आचार्यांच्या विचाराशी प्रभावीत होऊन भामीशी लग्न करते. पण भीमाचे वागणे हे पूर्ण अशिक्षित माणसाचेच असते. दारु पिणे, बायकोला मारणे, शिवीगाळ करणे, अशा गोष्टी क्षुल्लक मानणारी माणसे कल्याणीला सुद्धा तसाच त्रास देतात व तिला मानणारी कळून चुकते की ही माणसे कधीही सुधारणे शक्य नाही व आपण त्यांना सुधारणे हे सगळे खोटे आहे.

३. कल्याणी घरी येते तेव्हा नाना, नानी, आई, बाबा सगळेच काहीही विचारत नाहीत, तिच्या शरीरावरील वळ बघून ते सगळं काही समजून घेतात. कल्याणी भीमापासून घटस्फोट घ्यायचे ठरवते. या गोष्टीसाठी कुणाचाही विरोध नसतो कारण कल्याणीचे आजी आजोबांनी स्वातंत्र्यपूर्व काळात आंतरजातीय

प्रेमविवाह केलेला असतो व तिच्या आई-वडिलांनीही प्रेमविवाह केलेला असतो. त्यामुळे घरात तिला कोणताही निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य असते.

४. कल्याणी आपल्या दोन्ही पिढ्यांच्या जीवनाचा शोध घेऊ लागते. त्यातून तिला सुधारणावाद, कृतिशीलता या गोष्टी खोट्या वाटतात. ती आचार्यांकडे जाते तेव्हा ते म्हणतात, आयुष्यभर मी जोपासलेल्या मूल्यांचा हा पराभव आहे मी केलेला प्रयोग फसला, असंच म्हणावं लागेल, पण तरीही मी आशावादी आहे. या क्षणी सुद्धा [२५] त्यावेळी कल्याणीला कळून चुकते की परत कुणाचा तरी बळी जाणार आहे.

५. कल्याणीला समाजसेवा कृतिशीलता वगैरे सगळं फसवं आहे हे कळून चुकते त्यामुळे ती आचार्य जेव्हा भीमाशी आश्रमातील मुलगी उषाचे लग्न लावून देण्याचे ठरवतात तेव्हा कल्याणी उषाला आचार्यांच्या कृतीपासून वाचवण्यासाठी दत्तक घ्यायचे ठरवते आणि आचार्यांना म्हणते, आमच्या समोर तुम्ही स्वतःच्या स्वार्थापोटी खोटी-बेगडी बंडखोरीची साधनं उभी करुन ठेवताय. करवतीवर मखमल ठेवून त्यावरुन रक्ताळेपर्यंत धावायला लावताय आणि त्याचं महात्मेपण मिरवत तुम्ही फिरताय. बंद करा हे सगळं. शिसारी येतेय तुमच्या या कृतीची[२६] आणि उषाला घेऊन कल्याणी निघून जाते.

सारांश, शहामृग या कथासंग्रहातील सती आणि महात्मा या कथेतून समाजसुधारणेतील बेगडीपणाचे चित्रण आले आहे. सती आणि महात्मा या कथेत आचार्य समाज सुधारणेसाठी सुधारणावादाचा प्रयोग कल्याणीला घेऊन करतात पण कल्याणी त्या प्रयोगामुळे तावून-सुलाखून निघते. आचार्यांना मात्र त्याची झळ सुद्धा पोहचत नाही उलट परत ते उषाला या प्रयोगासाठी निवडतात. त्यावेळी मात्र कल्याणी आचार्यांच्या विरोधात उभी राहते याचे चित्रण यात येते.

**६. राजकारणातील सत्ता-संघर्षाचे चित्रण :-**

राजकारण हे काही घराण्यातून परंपरेने चालत आलेले दिसते. त्यामुळे एकाच घरातील लोक वंशपरंपरेने सत्तेवर येतात. पण त्या लोकांच्यामध्ये सत्तेची हाव असते. मग हेच लोक सत्तेसाठी काहीही करण्यास तयार असतात. एकाच रक्ताची, नात्याची असूनही हे लोक एकमेकांच्या जीवावर उठतात व सत्ता मिळवण्याचा प्रयत्न करतात. अशाच एका घराण्यातील सत्ता-संघर्षाचे चित्रण शोभणेंनी आपल्या कथेतून केले आहे.

शोभणे यांच्या शहामृग या कथासंग्रहातील खेळीया या कथेतून राजकारणातील सत्ता-संघर्षाचे चित्रण दिसून येते.

खेळीया या कथेत केंद्रीय नानासाहेबांचे निधन झालेले असते. संसदेतील त्यांची रिक्त जागा शासनाला ताबडतोब भरावयाची असते. पोटनिवडणुकीची घोषणा झालेले असते. संसदेतील त्यांची रिक्त जागा शासनाला ताबडतोब भरावयाची असते. पोटनिवडणुकीची घोषणा होऊ शकते म्हणून नानासाहेब हे सत्तारूढ पक्षाचे

मंत्री असल्यामुळे या सत्तारूढ पक्षाचे तिकीट नानासाहेबाचे भारतीय राजकारणातील वजन लक्षात घेता त्यांच्या घरातील कुणातरी वारसदारालाच द्यायचा निर्णय पक्षश्रेष्ठी घेतात. पण नानासाहेबांच्या घरातच नानासाहेबांची विधवा बहीण माईसाहेब, नानासाहेबांनी आपला राजकीय वारसा चालावा म्हणून तिचा संसार मोडून आपल्या जवळ आणलं अशी त्यांची नात मालविका, नानासाहेबांचा भाऊ शिरूभाऊ, माईसाहेबांचा मुलगा संभाजी यांच्यात अप्रकट सत्तासंघर्ष उभा राहतो. एकाच रक्ताच्या नात्याने बांधलेली ही माणसे सत्तासंघर्षात मात्र एकमेकांच्या जीवावर उठतात.

मालविकाला या सत्तासंघर्षात उतरण्यास तिचा नवरा शेखर तिला मनाई करतो. तिची आईसुद्धा तिला हे सर्व सोडून संसार करण्यास सांगते. पण माईसाहेबांचा मुलगा संभाजी तिला सत्तासंघर्षात उतरण्यास प्रोत्साहन देतो. तिच्या पूर्ण पाठिशी उभा राहतो. माईसाहेब या सत्तेसाठी आपला संसार उधळून आलेल्या असतात. त्यामुळे त्या सत्तेसाठी वाट्टेल ते करायला तयार असतात. त्यांना राजकारणातील बराच अनुभव व ओळख असल्याने त्याचा फायदा उठवून त्या आपलीच भाची मालविकाला मारण्याचा प्रयत्न करतात. दिल्लीमध्ये सारख्या फेऱ्या मारून तेथील उमेदवारांना आपल्या बाजूने करुन घेतात. माईसाहेबांच्या राजकीय डावपेचाला मालविका कमी पडते आणि या सत्तासंघर्षात तिकीट माईसाहेब मिळवतात. पण इथेच हा संघर्ष थांबत नाही तर माईसाहेबांचा मुलगा संभाजी मालविकाला स्वतंत्रपणे निवडणूक लढवण्यास भाग पाडतो आणि हा संघर्ष पुढे तसाच चालू राहतो.

अशा प्रकार खेळीया या कथेच्या आशयावरून आपल्याला या कथेत राजकारणातील सत्तासंघर्षाचे चित्रण आलेले आहे हे समजते तसे घटना प्रसंगावरून राजकारणातील सत्तासंघर्ष दिसून येतो.

१. नानासाहेबांचा मृत्यू होतो आणि संसदेत केंद्रीयमंत्री गेल्याने खळबळ उठते. नानासाहेब सत्तारूढ पक्षाचे मंत्री असल्यामुळे या पक्षाचे तिकीट भारतीय राजकारणातील वजन लक्षात घेता त्यांच्यात घरातील कुणातरी वारसदाराला द्यायचा निर्णय पक्षश्रेष्ठी घेतात. पण नानासाहेबांच्या घरात त्यांचे भाऊ शिरूभाऊ, बहीण माईसाहेब आणि नात मालविका असे तीन उमेदवार असतात.

२. माईसाहेब सत्तेसाठी आपला संसार उधळून आलेल्या असतात. त्यामुळे त्यांना ही सत्ता हवी असते तर नानासाहेबांनी मालविका सत्तेत आणण्यासाठी संसार तोडण्यास भाग पाडलेले असते व लहानपणापासून सत्तेची स्वप्न पाहिल्यामुळे मालविलाका सुद्धा सत्तेची लालसा असते.

३. नानासाहेबांची सून कमल ही विधवा असते आणि तिला एकच मुलगी असते ती म्हणजे मालविका. कमल व मालविका मध्ये बोलनं होते. त्यावेळी समजते की कमलला सुद्धा प्राध्यापिका व्हायची इच्छा होती. पण नानासाहेबांच्या सत्तेवर असण्याने त्यांनी तिला संस्थेचा सेक्रेटरी केले. कमलने फक्त सह्याव्यक्तिरिक्त तिथे काहीच केले नाही या नेहमीच गप्प बसून राहिल्या त्यामुळे त्यांना मालविकाच्या लग्नापासून घटस्फोटापर्यंत काहीही विचारलेले नसते.

४. मालविकाला सत्तेत येण्यासाठी माईसाहेबांचा मुलगा संभाजीच प्रवृत्त करतो. कारण माईसाहेबांविषयी संभाजीच्या मनात कटुता भरलेली असते. पन्नाशी आल्यानंतर माईसाहेब घटस्फोट घेऊन सत्तेसाठी माहेरी आलेल्या असतात. त्यामुळे त्यांचे पती सुद्धा एक वर्षात हृदयविकाराच्या झटक्याने जग सोडून जातात. म्हणून संभाजी माईसाहेबांच्या विरोधात असतो. पण मालविकाला नानासाहेबांनी राजकीय वारसा चालवण्यासाठीच घरी घटस्फोट घ्यायला लावून आणलेले असते. या सत्तेवर तिचा हक्क आहे असे संभाजीला वाटते. संभाजी मालविकाला संपूर्ण पाठिंबा देतो.

५. मालविकाला तिचा नवरा शेखर या राजकारणाच्या चक्रव्यूहामध्ये न पडण्यास सांगतो. पण मालविका ऐकत नाही. मग नानासाहेबांच्या घरातील छुप्या सत्तासंघर्षाची कुणकुण पत्रकारांना लागते. पत्रकार येवून मालविकाची, माईसाहेबांची मुलाखती घेवून छापू लागतात. माईसाहेब दिल्लीत आपल्यापरीने मोर्चे बांधणी करतात. शिरूभाऊ विरोधी पक्षाशी हात मिळवणी करतात. मालविका कडून संभाजी सर्व प्रयत्न करत असतो.

६. मालविकाच्या बंगल्यावर दगड जातात. मालविकाच्या गाडीचा पाठलाग केला जातो. संभाजी तिच्या बरोबर असल्याने तिला काहीही होत नाही. ती सुरक्षित राहते. शिरूभाऊच्या मागच्या भानगडी पेपरमधून छापल्या जातात व हे सर्व माईसाहेब करतात हे पुराव्यासहीत शिरूभाऊ माईसाहेबांना येवून सांगतात आणि एके दिवशी पेपरातून बातमी येते की माईसाहेबांना तिकीट मिळाले. पण इथेच हा सत्तासंघर्ष थांबत नाही. संभाजी मालविकाला स्वतंत्रपणे निवडणुक लढण्यास तयार करतो.

सारांश, शहामृग या कथासंग्रहातील खेळीया या कथेमधून राजाकरणातील सत्तासंघर्षाचे चित्रण आलेले आहे. खेळीया या कथेत माईसाहेब, मालविका, शिरूभाऊ या तीन सदस्यांमध्ये नानासाहेबांच्या संसदेतील रिक्त जागा भरण्यासाठी संघर्ष चालू होतो. या सत्तासंघर्षामध्ये रक्ताची नाती असूनही एकमेकावर आरोप केले जातात व माईसाहेब तर आपल्याच भाचीला मारण्याचा प्रयत्न करतात व भावाला बदनाम करुन स्वत: सत्तेवर येतात हेच यातून चित्रित केले आहे.

**समारोप :-**

रवींद्र शोभणेंचे वाङ्मयीन कर्तृत्वा पाहिल्यानंतर असे दिसून येते की त्यांच्या एकूण पाच कादंबऱ्या व तीन कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. त्यांना बरेच पुरस्कारही मिळाले आहेत. शोभणेंनी समीक्षा केली आणि समीक्षेच्याच अंगाने परिपूर्ण ठरेल असा श्री. ना. पेंडसे यांच्या कादंबऱ्यांचा चिकित्सक अभ्यास करून स्वत:ला डॉक्टरेट पदवी मिळवून देणारा प्रबंध लिहिला. त्यामुळे डॉ. रवींद्र शोभणे हे नाव मराठी साहित्याला अपरिचित राहिलेले नाही असे दिसते.

रवींद्र शोभणेंच्या वर्तमान व शहामृग या कथासंग्रहाचा आपण अभ्यास करत असल्यामुळे त्यांची वैशिष्टये आपण पाहिली तर असे दिसते की, त्यांचे कथालेखन उल्लेखनीय झालेले आहे. दोन्ही कथासंग्रहामध्ये व्यक्तित्वाला अधिक महत्त्व दिलेले आहे. वर्तमान हा कथासंग्रह पूर्ण नागरी जीवनाचे चित्रण करतो. तर शहामृग मध्ये नागरी व ग्रामीण जीवनाचे चित्रण आलेले आहे. तसेच वातावरणानुसार नागर तथा ग्रामीण जीवनाचे चित्रण येते व प्रसंगानुरूप भाषाशैलीचा वापर केलेला आहे. कथांच्या आशयामध्ये व आशयसूत्रांमध्ये विविधता दिसून येते.

वर्तमान व शहामृग या कथासंग्रहातील कथेतील आशयसूत्रे आपण पाहिली. त्यामध्ये आपण कथेतील आशयाचा व घटनाप्रसंगाचा विचार केलेला आहे. सर्व कथांतून राजकीय जीवनातील भ्रष्ट व्यवहार, स्त्री-पुरूषसंबंधातील ताणतणाव, वृत्तपत्रीय जगतातील अनीतिमानता, मानसिक दमनातून निर्माण झालेली विकृती, समाज सुधारणेतील बेगडीपणा, राजकारणातील सत्तासंघर्षाचे चित्रण ही आशयसूत्रे आलेली दिसतात.

राजकीय जीवनातील भ्रष्ट व्यवहार या आशयसूत्रांचे चित्रण वर्तमान कथासंग्रहातील पायरीचा दगड, जल्लोश, तेथ लव्हाळे राहती या कथांमधून आलेले दिसते. पायरीचा दगड या कथेत बाळासाहेब व सुधीर या दोन्ही कार्यकर्त्यांनी भ्रष्ट व्यवहाराचा उपयोग करुन आपल्या मानसिक दमनातून निर्माण झालेली विकृती या आशयसूत्राचे चित्रण वर्तमान या कथासंग्रहातील केसाळ कातडीचे श्वापद या कथेमधून आलेले दिसते. या कथेत वेणू जगताप ही मानसिक विकृती निर्माण झालेली चाळीशी ओलांडलेली अविवाहीता असते. तिच्या वासनानी केसाळ कातडीच्या श्वापदाचे रूप धारण केलेले असते. म्हणून ती विकृत वागत असते.

समाज सुधारणेतील बेगडीपणा या आशयसूत्राचे चित्रण शहामृग या कथासंग्रहातील सती आणि महात्मा या कथेतून आलेले दिसते. या कथेत आचार्य समाजसुधारणेसाठी सुधारणावादाचा प्रयोग कल्याणीला घेऊन करतात पण कल्याणी त्या प्रयोगातून तावून-सुलाखून निघते. आचार्य मात्र सुधारणावादाचा प्रयोग उषाला घेवून करायला निघतात त्यावेळी कल्याणी आचार्यांच्या सुधारणावादाची बेगडीपणाच्या विरोधात उभी राहते.

राजकारणातील सत्ता-संघर्ष या आशयसूत्राचे चित्रण शहामृग या कथासंग्रहातील खेळीया या कथेतून आलेले दिसते. या कथेत माईसाहेब मालविका, शिरूभाऊ या तीन सदस्यांमध्ये नानासाहेबांची संसदेतील रिक्त जागा भरण्यासाठी संघर्ष चालू होतो. या सत्तासंघर्षामध्ये रक्ताची नाती असूनही एकमेकांवर आरोप केले जातात व माईसाहेब आपल्याच भाचीवर मालविकावर मारेकरी पाठवतात. भाऊ शिरूभाऊला बदनाम करुन स्वत: सत्तेवर येतात.

अशा प्रकार वर्तमान व शहामृग कथासंग्रहातील कथांमधून आशयसूत्रे आलेली दिसतात. तसेच त्यांच्या कथांतून आशयातून व आशयसूत्रातून विविधता आलेली दिसते. आता आपण या आशयसूत्रांच्या अनुषंगाने त्यांच्या कथेमधील पात्रांचे परस्परांशी आलेले संबंध याचा अभ्यास करणार आहोत.

# संदर्भ आणि टिपा


| | | | |
|---|---|---|---|
| १. | जोग वि. स. | : | ग्रांथिकी युगवाणी / मे-जून, ९३,<br>वर्तमान : कसदार कथासंग्रह - पृ. ४६ |
| २. | | : | तत्रैव - पृ. ४६ |
| ३. | शोभणे रवींद्र | : | मनोगत : प्रा. डॉ. रवींद्र शोभणे<br>६६ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन,<br>सातारा अजिंक्य पृ. १७१ |
| ४. | शोभणे रवींद्र | : | वर्तमान, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई - पृ. ५७ |
| ५. | शोभणे रवींद्र | : | शहामृग, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई प्रस्तावनेच्या निमित्ताने |
| ६. | कटोले शारदा हरीश | : | शहामृग : मानवी आंतरसंबंधाच्या शोधाच्या कथा<br>साहित्य-जत्रा, ग्रंथायन, रविवार ६ डिसेंबर १९९८ पृ. ७ |
| ७. | आगाशे प्रसन्न | : | व्यक्तित्व तपासणारा आरसा - शहामृग, मुंबई तरुण भारत, आसमंत. |
| ८. | शोभणे रवींद्र | : | उनि. पृ. १४ (वर्तमान) |
| ९. | शोभणे रवींद्र | : | उनि. पृ. ११७ (वर्तमान) |
| १०. | शोभणे रवींद्र | : | उनि. पृ. १३७ (वर्तमान) |
| ११. | शोभणे रवींद्र | : | उनि. पृ. ४६ (वर्तमान) |
| १२. | शोभणे रवींद्र | : | उनि. पृ. ५३ (वर्तमान) |
| १३. | शोभणे रवींद्र | : | उनि. पृ. ५३ ते ५४ (वर्तमान) |
| १४. | शोभणे रवींद्र | : | उनि. पृ. ८९ (वर्तमान) |
| १५. | शोभणे रवींद्र | : | उनि. पृ. १०९ (वर्तमान) |
| १६. | शोभणे रवींद्र | : | उनि. पृ. १११ (वर्तमान) |
| १७. | शोभणे रवींद्र | : | उनि. पृ. १५ (शहामृग) |
| १८. | शोभणे रवींद्र | : | उनि. पृ. ३६ (शहामृग) |
| १९. | शोभणे रवींद्र | : | उनि. पृ. ५६ (शहामृग) |
| २०. | शोभणे रवींद्र | : | शहामृग उनि. पृ. ७४ ते ७५ |
| २१. | शोभणे रवींद्र | : | उनि. पृ. ३४ (वर्तमान) |
| २२. | शोभणे रवींद्र | : | उनि. पृ. ५८ (वर्तमान) |
| २३. | शोभणे रवींद्र | : | उनि. पृ. ५९ (वर्तमान) |
| २४. | शोभणे रवींद्र | : | उनि. पृ. ६९ (शहामृग) |
| २५. | शोभणे रवींद्र | : | उनि. पृ. १९७ (शहामृग) |